सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
● dainiktarunbharat.com ● epaper.dainiktarunbharat.com
धाराशिव | बुधवार, १० सप्टेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २८० | पाने १२ | किंमत रु. ६/-

# आगीत होरपळून आजोबांसह २ वर्षीय नातवाचा दुर्दैवी अंत

- भरधाव टिप्परने दुचाकीला चिरडले
- वैराग-बार्शी रोडवर काळीज पिळवटणारी घटना!


दत्तात्रय पाखरे


शंभू पाखरे

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ९ डिसेंबर-**

वैराग-बार्शी रोडवर आज सकाळी एका थरकाप उडवणाऱ्या भीषण अपघातात माणेगाव येथील आजोबा आणि त्यांच्या दोन वर्षांच्या नातवाला आपला जीव गमवावा लागला. भरधाव वेगातील टिप्परने दुचाकीला जोरदार धडक दिली, ज्यामुळे दुचाकीने क्षणार्धात पेट घेतला आणि या आगीत होरपळून दोन वर्षांच्या शंभू पाखरेचा जागीच मृत्यू झाला.

माणेगाव येथील दत्तात्रय पाखरे हे आपला दोन वर्षांचा नातू शंभू भारत पाखरे याला घेऊन दुचाकीवरून वैरागहून आपल्या गावी परतत होते. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते वैराग-बार्शी रोडवरील छत्रपती कार केअर समोर आले असता, समोरून येणाऱ्या भरधाव टिप्परने अचानक आपली लेन सोडून त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरात धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, धडकेनंतर दुचाकी रस्त्यावर कोसळली आणि क्षणार्धात दुचाकीने पेट घेतला. या दुर्घटनेत दुचाकीवरील आजोबा दत्तात्रय पाखरे आणि चिमुकला नातू शंभू दोघेही भाजले गेले. दुर्दैवाने, चिमुकला शंभू याचा जागीच मृत्यू झाला. उपचाराअभावी आजोबांची प्राणज्योत मालवली. घटनास्थळाजवळ आरोग्य केंद्र असूनही वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध होऊ न शकल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. स्थानिकांनी त्यांना खासगी वाहनातून रुग्णालयाकडे रवाना केले, उपचारासाठी नेताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

### पाखरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर

पाखरे कुटुंबात दोन मुलींनंतर शंभूचा जन्म झाला होता, त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण होते. मात्र, या भयानक अपघाताने त्यांच्या आनंदावर काळाने घाला घातला आहे. एकाच घरातील दोन सदस्यांचा अशा पद्धतीने अंत झाल्याने माणेगाव आणि परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.

### टिप्पर चालक फरार

अपघातानंतर टिप्पर चालक वाहन सोडून घटनास्थळावरून पसार झाला. मात्र, उपस्थित नागरिकांनी प्रसंगावधान राखत टिप्परचा क्रमांक पोलिसांच्या स्वाधीन केला आहे. प्रत्यक्षदर्शींच्या मते, टिप्परचा वेग अत्यंत जास्त होता. या प्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात नोंद झाली असून, पोलीस चालकाचा कसून शोध घेत आहेत.

# भारताने १०१ धावांनी जिंकला पहिला टी-२०



**कटक :** भारताने पहिल्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १०१ धावांनी पराभव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. मंगळवारी कटकमधील बाराबती स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हार्दिक पंड्याच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने ६ विकेट गमावून १७५ धावा केल्या. प्रत्युत्तरात, पाहुणा संघ ७४ धावांवरच मर्यादित राहिला. आफ्रिकेची ही सर्वात कमी धावसंख्या आहे.

भारताने १०० धावा किंवा त्याहून अधिक फरकाने टी-२० जिंकण्याची ही नववी वेळ आहे. भारताकडून अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.









CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे खा. प्रणिती शिंदे यांचा वाढदिवस साजरा

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज काँग्रेस भवन येथे सोलापूर ग्रामीणच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रा. सातलिंग शटगार यांच्या हस्ते केक कापून राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी व खासदार प्रणिती शिंदे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, राधाकृष्ण पाटील, संघटक सिद्राम पवार, उपाध्यक्ष सुदर्शन आवताडे, महमद शेख, दत्तात्रय गजबार,अकबर शेख, दत्तात्रय पवार, अप्पू शेख, रतन भोसले, देवेंद्र सैनसाखळे, इक्बाल शेख,संजय गायकवाड उपस्थित होते. यावेळी बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. सातलिंग शटगार यांनी मनोगत व्यक्त केले.




### करवा परिवारातर्फे दोन संस्थांना प्रेरणा निधीचे वितरण

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँकेचे संस्थापक विश्वनाथ करवा यांच्या दहाव्या पुण्यतिथी निमित्त सामाजिक बांधिलकी म्हणून दोन संस्थांना प्रेरणा निधी वितरण कार्यक्रम पार पडला. सम्राट चौक येथील नीलकंठ को-ऑप बँकेच्या सभागृहात आयोजित या उपक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ धनंजयजी माने, नीलकंठ को-ऑप बँकेचे व्हाईस चेअरमन पद्मा भुतडा, नीलकंठ बँकेचे संचालक कौस्तुभ करवा आदी मान्यवरांची उपस्थिती होती. दोन सामाजिक संस्थांना हा निधी देण्यात आला. यावेळी राजस्थानी विकास मंडळाचे अध्यक्ष माणिकचंद डागा व आस्था रोटी बँक फौंडेशनचे विजय गंगाधर छचुरे यांना प्रत्येकी २१ हजारांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. सूत्रसंचालन बरखा सारडा यांनी केले तर आभार कौस्तुभ करवा यांनी मानले. याप्रसंगी नीलकंठ को-ऑप बॅंकेचे संचालक रमेश राठी, चंद्रकांत तापडिया, शरद कालानी, सचिन कोठारी, अभिजीत चिल्लाल, जमनादास भुतडा, आनंद झंवर उपस्थित होते. चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, बांधकाम व्यावसायिक किशोर चांडक, सिद्धराम पाटील, रेखा माने उपस्थित होते. यावेळी ॲड. धनंजय माने म्हणाले, विश्वनाथ करवा हे महाविद्यालयीन जीवनापासूनच समाजकार्यात सक्रिय होते. आज त्यांच्या सौभाग्यवती नंदा करवा याही त्यांचा सामाजिक कार्याचा वारसा पुढे चालवत आहेत.



### जायंट्स ग्रुपतर्फे पूर्वविभाग वाचनालयास पुस्तके भेट

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरवतीने पूर्व विभाग वाचनालयास ग्रंथ (पुस्तक) भेट देण्यात आली. हल्लीच्या पिढीला लहान ते मोठ्यानंपर्यंत मोबाईलचे वेड लागले आहे. या काळात वाचनालयचे महत्व लहानपणा पासूनच पटावे या हेतूने जायंट्स ग्रुपने इयत्ता पहिले ते नववी च्या विध्यार्थ्यांना उपयुक्त असे ४७ पुस्तके वाचनालयास देणगी स्वरूपात दिले. याबद्दल वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांनी जायंट्स ग्रुपचे कौतुक केले. त्यांच्या हस्ते देणगीदार नागनाथ कोंडा यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जायंट्स फेडरेशन संचालक किसन आडम, ऑफिसर श्रीनिवास कोंडले, जायंट्स फेडरेशन माजी उपाध्यक्ष नागनाथ कोंडा, वाचनालयाचे उपाध्यक्ष देविदास गोटीपामुल, संचालक विजयकुमार गुल्लापल्ली, अरविंद चिनी, दत्तात्रय कारमपुरी, गणपत कुरापाटी व ग्रंथपाल रमा इप्पलपल्ली उपस्थित होते.

# कामात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी गवसू कार्यालय अधीक्षकांसह ७ कर्मचाऱ्यांना दंड

## महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
मालमत्ता कर विभाग आणि निवडणूक कार्यालया संबंधीची जबाबदारी पार पाडण्यात झालेल्या अपयश आणि कामात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी महापालिकेच्या गवसु कार्यालय अधीक्षकांसह ७ कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी ही कारवाई केली.

मालमत्ता कर विभागातील आढळ न होणाऱ्या व दुबार नळ-मिळकतींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित आढावा बैठकीत संबंधितांची तात्काळ यादी तयार करून प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले होते. यासंदर्भात परिपत्रकाद्वारे स्पष्ट कार्यपद्धतीही निश्चित केली होती.

या गवसू विभागातील मिळकतींचा पंचनामा, थकबाकी निर्लेखन तसेच यादी प्रसिद्ध करण्याची जबाबदारी कार्यालय अधीक्षक विनोद कुलकर्णी आणि त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आली होती. मात्र वेळोवेळी घेतलेल्या बैठकींमध्ये कामकाज अत्यंत संथ असल्याचे तसेच निर्धारित कालमर्यादेत आवश्यक कार्यवाही न झाल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, दि. ६ व ०७ डिसेंबर २०२५ रोजी मिळकतींची यादी प्रसिद्ध करण्याचे आदेश देऊनही संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याचे अहवालांमधून उघड झाले. शिवाय वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या आढावा बैठकींनाही ते उपस्थित राहिले नाहीत. याशिवाय, सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भातील काम काजही या कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आले होते, मात्र हे काम देखील अपूर्ण असल्याचे निवडणूक विभागाने बैठकीत कळविले. अशाप्रकारे मालमत्ता कर विभाग आणि निवडणूक कार्यालया संबंधीची जबाबदारी पार पाडण्यात झालेल्या अपयशामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१) चे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६(२)(ड) नुसार ही कारवाई करण्यात आली आहे. काम काजातील शिस्त आणि जबाबदारीबाबत कोणतेही शिथिल धोरण नसल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

### 'या' अधिकारी, कर्मचाऱ्यांवर झाली दंडात्मक कारवाई

महापालिका प्रशासनाने या कर्मचारी व अधिकाऱ्यांना कारवाई करत दंड आकारला आहे. यामध्ये गवसु कार्यालय अधीक्षक विनोद कुलकर्णी यांना १० हजार रुपये दंड, वरिष्ठ श्रेणी लिपिक अ. करिम बागवान , कनिष्ठ श्रेणी लिपिक विश्वनाथ इरकल, जुबेर शेख, रमेश गायकवाड, ताहिर कारभारी, दिनेश गायकवाड यांना प्रत्येकी १ हजार रुपये दंड करण्यात आला आहे.हा दंड डिसेंबर २०२५ महिन्यातील पगारातून (जानेवारी २०२६ पेड) एकरकमी वसूल करण्यात येणार असून, संबंधित नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्याचे निर्देश आयुक्त डॉ . सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत.




### लोकमंगल परिवाराचा स्नेहसंवाद मेळावा उत्साहात

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
लोकमंगल परिवाराच्या वतीने हेरिटेज गार्डन येथे स्नेहसंवाद मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्यास लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

आमदार देशमुख म्हणाले की, सभासदांचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांची कामावरील निष्ठा यामुळे लोकमंगल परिवारातील बँक, पतसंस्था व मल्टीस्टेट या तिन्ही आर्थिक संस्थांनी ५००० कोटी व्यवसायाची ऐतिहासिक पूर्तता केली आहे. लोकमंगल परिवार नेहमी शेवटच्या घटकातील व्यक्तींना केंद्रबिंदु मानून त्यांना आधार व सक्षम बनविण्यासाठी काम करत असून ते यापुढेही चालू राहील. सभासदांनी लोकमंगलवर ठेवलेला विश्वास आणखी दृढ करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. लोकमंगल फाउंडेशनच्या माध्यम ातून अन्नपूर्णा योजना, सामुदायिक विवाह सोहळा याबरोबरच शहर व जिल्ह्यातील गोरगरीब गरजू रुग्णांना निरंतर मोफत गोळ्या, औषधे वाटप करण्याचे ठरविले असून त्याची प्राथमिक सुरुवात १२ डिसेंबर रोजी करण्याचा मानस आहे.

पतसंस्थेचे तज्ञ संचालक ॲड. गजानन भाकरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली, व्हा. चेअरमन निर्मला कुंभार, कार्यकारी संचालक मनीष देशमुख, संचालक फैय्याज मुलाणी, भुताळी बाराचारी, लक्ष्मी नडगेरी, बँकेचे संचालक जितेंद्र लाड, प्रल्हाद कांबळे, सिद्धार्थ सर्जे, अभिजीत टाकळीकर, फाउंडेशन चे संचालक मारुती तोडकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस, पतसंस्थेच्या सरव्यवस्थापिका अलका देवडकर, मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन सतीश लोंढे यांनी केले. सुदन सुरवसे यांनी आभार मानले.

# सक्षम पर्यायी मार्ग द्या, अन्यथा दमाणी नगरचा पूल पाडू देणार नाही

## वाहतूक शाखेने पाहणी करत युवक काँग्रेसचे म्हणणे घेतले ऐकून

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
मरिआई चौक ते भैय्या चौक म ार्गावरील रेल्वे ब्रिजचे पाडकाम करण्यापुर्वी ये - जा करणाऱ्या वाहनांना सक्षम पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा अन्यथा दमाणी नगरचा रेल्वे पूल पाडू देणार नाही असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुहास कदम यांनी दिला.

मरिआई चौक ते भैय्या चौक दरम्यान असणारे ब्रिटीशकालीन रेल्वे पुल पाडकामाबाबत रेल्वे प्रशासन व सोलापूर महानगरपालिका यांनी जो निर्णय घेतला आहे तो योग्यच आहे. परंतु सदर ब्रिजवरून हजारो वाहनांची वाहतूक होते. विशेषतः तो मार्ग सोलापूर ते मंगळवेढा, कोल्हापूर हा मुख्य मार्ग म्हणून ओळखला जातो. सलगरवस्ती, दमाणी नगर, थोबडेवस्ती, देगांव व आजू बाजूला असलेले खेडेगांवा मधील नागरीक या पुलावरून वाहतूक करतात. तसेच शाळकरी विद्यार्थी देखील या मार्गाने ये - जा करीत असतात त्यामुळे रेल्वे ब्रिजचे काम सुरू होण्यापुर्वी दोन्ही बाजुने सक्षम पर्यायी वाहतूक व्यवस्था होण्याकरिता मार्ग उपलब्ध करावेत, जेणेकरून अपघात व पोलीस प्रशासनावरचा ताण कमी होईल. महत्वाची बाब म्हणजे रेल्वे ब्रिजचे काम सुरू होत असताना पर्यायी मार्गावर वाहतूक नियंत्रण शाखेने अतिरिक्त वाहतूक नियंत्रण पोलीस कर्मचारी नेमणूक करावी जेणे करून वाहतूक सुरळीत होईल अशी मागणी वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त गोहर हसन यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी शरचंद्र पवार गटाचे चंद्रकांत पवार, सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार आदी उपस्थित होते.

### महिलांनी येथून प्रवास कसा करावा

पर्यायी मार्गावरती लाईटची व्यवस्था नाही. एक वर्ष हा पूल बंद असणार आहे. महिलांनी येथून प्रवास कसा करावा. त्यामुळे सक्षम पर्यायी व्यवस्था जोपर्यंत होत नाही तोपर्यंत पूल पाडू देणार नसल्याची भूमिका माऊली पवार यांनी व्यक्त केली.



### आज तीव्र आंदोलन करणार

दमानी नगरचा पुल हा बंद करण्यात येणार आहे. या मतदारसंघातील आम दारांनी कोणताही हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे राष्ट्रवादीच्या वतीने आज तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा चंद्रकांत पवार यांनी दिला.



### जिल्हा नागरी सहकारी बॅक्स असोसिएशन अध्यक्षपदी डॉ. अशोक सुरवसे, उपाध्यक्षपदी दीपक मुनोत

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅंक्स असोसिएशनच्या २०२५-२६ ते २०२७-२८ या वर्षासाठी अध्यक्षपदी डॉ. अशोक सुरवसे व उपाध्यक्षपदी दिपक मुनोत यांची निवड करण्यात आली.

अध्यासी अधिकारी उमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत डॉ. अशोक सुरवसे यांचे नांव सी.ए. किसन माळी यांनी सुचविले. त्यास कल्याणराव काळे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्ष दिपक मुनोत यांचे नाव सी.ए राजगोपाल मिणियार यांनी सुचविले. राजगोपाल झंवर यांनी अनुमोदन दिले. अध्यासी अधिकारी उमेश पवार यांचा सत्कार प्रकाश वाले यांच्या हस्ते करण्यात आला. सीए राजगोपाल मिणियार यांनी तत्कालीन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी मागील वर्षभरात चांगले कामकाज केल्याबद्दल असोसिएशच्या वतीने आभार मानले. सभेस सी.ए. किसन माळी, कल्याणराव काळे, अशोक लुणावत, शंकर पाटील, दिनकर देशमुख, संचालिका संगीता फाटे, अस्मिता गायकवाड व सीईओ शुभांगी ढवळे उपस्थित होते.

### व्हॅलेंटाईन स्कूलच्या आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिरात नर्सरी ते इ १० पर्यंतच्या एकूण १५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. याचे उद्घाटन अस्थिरोग तज्ञ डॉ अभिजीत वाघचवरे, त्वचारोग तज्ञ डॉ राजश्री वाघचवरे, आयूर्वेदिक डॉ नविन संतोष गड्डम यांच्या उपस्थितीत धन्वंतरी पूजनाने करण्यात आली.

याचे संयोजन आयुर्वेदिक डॉ नविन संतोष गड्डम यांनी केले. शिबीरात डॉ अमर बंडी, डॉ हेमाक्षी बंडी, डॉ ज्योती गायकवाड, डॉ संजना नामा, डॉ सायली भांगे, डॉ स्वप्निल सामील, डॉ ऐश्वर्या वर्णेकर, डॉ विशाल भोसले, डॉ कोमल मानकर, डॉ विशाल अंधलकर, डॉ वेदिका पगडीमल, डॉ अनंत म्हेत्रे, डॉ दिनेश पगडीमल, डॉ अमित विटकरी, डॉ परमेश्वर निकम, डॉ प्रकाश तोलानी या तज्ञ डॉक्टरांच्या सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डु, सहसचिव नागेश शेंडगे व मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन तेजश्री पगडीमल यांनी केले. श्वेता येमेकर यांनी आभार मानले.

# शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पुण्याराधनानिमित्त १५ डिसेंबरपासून विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**
श्री बृहन्मठ होटगी मठाचे तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्याराधनानिमित्त काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सान्निध्यात व बृहन्मठाध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक, शैक्षणिक व समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन अक्कलकोट रोड येथील मठात सोमवार १५ डिसेंबर ते शुक्रवार १९ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे. मठात दररोज सायं.६.०० ते ७.०० या वेळेत वीरशैव धर्मग्रंथ श्री सिद्धांत शिखामणी ग्रंथ पारायण होईल.

बाळीवेस (उत्तर कसबा) येथील मठात सोमवार दि१५ डिसेंबर ते शुक्रवार दि.१९ डिसेंबर पर्यंत दररोज सायं.४.०० वा. श्री शिवयोगी सार्वभौम सिद्धेश्वर महाराज यांचे ग्रंथ पारायण होईल. शनिवार २० डिसेंबर रोजी पहाटे ५.०० वा श्रीस संगीत रुद्राभिषेक, महापूजा होईल.

**धार्मिक कार्यक्रम असे : बुधवार १० डिसेंबर ते शनिवार २० डिसेंबर** : दररोज साय.७.०० वा. मौजे होटगी (ता.द. सोलापूर) येथील बृहन्मठात प्रवचनकार पंडितरत्न वेदमूर्ती सिद्रामय्या शास्त्रीजी (विश्वाराध्य मठ बेडगीहाळ) यांचे तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींचे पुराण या विषयावर प्रवचन.



**शनिवार १४ डिसेंबर** : दु. ३.०० वा. श्री गुरु चन्नबसव प्रतिष्ठान (दुलंगे परिवार सोलापूर) यांच्या वतीने आरोग्य शिबिर, मोफत औषध वाटप.

**सोमवार १५ डिसेंबर ते शुक्रवार दि.१९ डिसेंबर** : दररोज सायं.४.०० वा. वीरशैव धर्मग्रंथ श्री सिद्धांत शिखाम णी ग्रंथ पारायण.

**बुधवार १७ डिसेंबरः** शालेय स्तरावर भगवद्गीता श्लोक पाठांतर स्पर्धा. सकाळी ९.०० : एस. व्ही. सी.एस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, भवानी पेठ येथे रक्तदान शिबिर.

**गुरुवार १८ डिसेंबर** : सकाळी ९.००वा. संस्थांतर्गत आंतरशालेय कबड्डी व हॉलीबॉल स्पर्धा.

**शनिवार २० डिसेंबर** : सकाळी ११ ते सायं. ८ पर्यंत भक्तांना महाप्रसाद, सायं. ७.३० ते ८.३० पारितोषिक वितरण रात्री ८.३० ते ९.३० शिवाचार्य धर्मसंदेश व जगद्गुरूंचे आशीर्वाचन, रात्री १०.१० वा. श्रीशैल पीठाचे जगद्गुरु डॉ.चन्नसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी व काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. म ल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते व चिटगुप्पा, मागणगेरी, माळकवठा, नागणसूर, वडांगळी, शिखर शिंगणापूर, डोणज , लक्ष्मीपूर, गौडगाव, मैंदर्गी शहापूर सुलतानपूर, करीबंटनाळ व अक्कलकोट येथील म हास्वामीजींच्या उपस्थितीत आत्मज्योत प्रज्वलन, गुरु नमन व श्रद्धांजली समर्पण. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यंत भजन.

**शनिवार २० डिसेंबर** : सकाळी ८.०० वा. तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींची बोरामणी येथून पायी पालखी सोहळा दर्गनहळी, कुंभारी मार्गे श्री वीरतपस्वी मंदिर, एम आयडीसी येथे पोहोचल्यानंतर पालखीचे स्वागत, महामंगलारती व महाप्रसाद वाटप. रात्री १० वा. बृहन्मठाध्यक्ष श्री चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते आत्मज्योत प्रज्वलन.

**रविवार २१ डिसेंबर** : स. ६वा. श्रीस अभिषेक, बिलवारचन, महापूजा ८वा. होटगी गावातून तपोरत्न आत्मज्योतीचे सवाद्य मिरवणूक, दुपारी १ वा. काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात धर्मसभा, महामंगलारती.

**सोमवार २२ डिसेंबर** : सायं.६ वा. पाळणा कार्यक्रम, रात्री ९ वा.श्री होटगीश्वर भक्त मंडळाकडून शोभेच्या आतषबाजीने महास्वामींजीच्या पुण्याराधना कार्यक्रमाचा सांगता.



# डॉ. कोटणीस यांना चीनमध्ये भारतीय देवदूताची उपाधी

### 'सीटू'चे महासचिव कॉ. एम. एच. शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**
भारताचे सुप्रसिद्ध मानवतावादी वैद्यकीय तज्ञ डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज त्यांच्या कार्याची आदरपूर्वक आठवण करण्यात आली. चीन-जपान युद्धकाळात रणांगणावर अखंड सेवा देत त्यांनी हजारो सैनिकांचे प्राण वाचवले. त्यांच्या अतुलनीय मानवी सेवेमुळे चीनमधील जनतेने त्यांना भारतीय देवदूत अशी गौरवपूर्ण उपाधी दिली, असे प्रतिपादन सीटूचे महासचिव कॉ. एम. एच. शेख यांनी श्रद्धांजली अर्पण करताना केले.

१९१० मध्ये सोलापूर जिल्ह्यात जन्मलेले डॉ. कोटणीस भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वैद्यकीय मदत पथकासोबत १९३८ मध्ये चीनमध्ये गेले. युद्धस्थितीत दिवस-रात्र शस्त्रक्रिया करून जखमी सैनिकांना जीवनदान देण्याचे त्यांचे कार्य विलक्षण होते. सलग २४ ते ३६ तास सेवा देण्याची त्यांची क्षमता अद्वितीय असल्याचे कॉ. शेख यांनी नमूद केले. मंगळवार, ९ डिसेंबर रोजी डॉ. कोटणीस यांच्या स्मृतीदिनानिमित्त डॉ. कोटणीस स्मारक येथे भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

माकपचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर म्हणाले, सेवाकाळात त्यांनी तेथील युवती गू क्विंगलान यांच्याशी विवाह केला. सेवेत झटताना झालेल्या अतिश्रमांम ुळे १९४२ मध्ये अवघ्या ३२व्या वर्षी त्यांचे निधन झाले, ही बाब त्यांनी विशेषत्वाने अधोरेखित केली. आजही चीन आणि भारत या दोन्ही देशांमध्ये त्यांच्या स्मरणार्थ उभारलेली स्मारके, रुग्णालये आणि विविध उपक्रमांमधून त्यांचे कार्य जिवंत ठेवले गेले आहे. डॉ. कोटणीस हे भारत-चीन मैत्रीचे प्रतीक, त्याग आणि मानवसेवेचे उत्तुंग उदाहरण आहे. यावेळी नसीमा शेख, सुनंदा बल्ला, दीपक निकंबे, विक्रम कलबुर्गी, अनिल वासम, दत्ता चव्हाण, लिंगवा सोलापूरे, बालकृष्ण मल्याळ, डी. रमेश बाबू, विजय हरसुरे, अभिजित निकंबे, विजय मरेड्डी, अंबादास बिंगी, नरसिंग म्हेत्रे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच अशोक बल्ला, अकील शेख, मल्लेशाम कारमपुरी, शिवा श्रीराम यांचीही उपस्थिती नोंदवण्यात आली.




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह




dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



आपल्या देशातील शंकराचार्य, विवेकानंद, संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. हेडगेवारांसारख्या महापुरुषांनी स्वत:च्या अल्प आयुष्यातच प्रचंड कार्य करून दाखवले. एखाद्या सामान्य माणसाला दिवसातील जेवढा वेळ उपलब्ध होतो तेवढाच या महापुरुषांनाही. पण दोघांत जमीन आस्मानचे अंतर आहे. कारण या महापुरुषांनी आपल्यासमोर एक महान ध्येय ठेवले होते आणि त्या ध्येयाच्या पूर्तीसाठी त्यांनी आपले शरीर, मन, बुद्धी सारे काही पणाला लावले होते.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# सात-बारावर चढणार आता स्वतंत्र नाव

## 'तुकडेबंदी' शिथिल करणारे विधेयक विधानसभेत मंजूर

## राज्यातील तीन कोटी नागरिकांना दिलासा

◆ **नागपूर, ९ डिसेंबर**

राज्यातील नागरी वस्त्यांमध्ये गुंठेवारी किंवा लहान भूखंडांवर राहणाऱ्या सुमारे ६० लाख कुटुंबांना म्हणजे , सुमारे तीन कोटी नागरिकांना दिलासा देणारे ऐतिहासिक तुकडेबंदी कायद्यातील जाचक अटी शिथिल करणारे 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५' आज विधानसभेत मंजूर करण्यात आले. विधेयकामुळे आता लहान भूखंडांची खरेदी-विक्री सुलभ होणार असून, संबंधित मालकांचे नाव स्वतंत्रपणे सातबारा उताऱ्यावर लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले.

अनेक वर्षांपासून नागरी भागात ५-१० गुंठे किंवा त्यापेक्षा कमी जागेत घरे बांधून राहणाऱ्या नागरिकांना मालकी हक्काच्या तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. तसेच, जमिनीच्या अकृषिक वापरासाठी वारंवार जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानग्या घ्याव्या लागत होत्या. या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या 'एनए' परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी एक वेळचे अधिमूल्य भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असे या विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे.

### कायद्याचा गैरवापर टाळा; विरोधकांच्या सूचना

विधेयकावर चर्चा करताना शिवसेनेचे (उबाठा) आमदार भास्कर जाधव यांनी, 'आमचा विधेयकाला तूर्त पाठिंबा नाही, याचा फायदा गरिबांऐवजी बिल्डर लॉबीला अधिक होण्याची शक्यता आहे,' असे म्हटले. काँग्रेसचे पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी, 'शहरांचे डीपी प्लॅन तयार नसताना केवळ जागा नियमित करून चालणार नाही, तर ९ मीटरचे रस्ते आणि गटारांची सोय कशी होणार, याचाही विचार व्हावा,' अशी सूचना मांडली. चर्चेदरम्यान आमदार चंद्रदीप नरके, विक्रम पाचपुते आणि रमेश बोरनारे यांनी हा निर्णय केवळ शहरांपुरता मर्यादित न ठेवता ग्रामीण भागासाठीही लागू करावा, अशी मागणी केली. (तभा वृत्तसेवा)




### विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये

- नागरी भागात जमिनीच्या अकृषिक वापरासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीची गरज नाही.
- नियोजन प्राधिकरणाने परवानगी दिल्यास 'एनए' परवानगी गृहीत धरली जाईल.
- गुंठेवारी आणि लहान तुकड्यांच्या खरेदी-विक्रीचा मार्ग सुलभ.
- सरसकट ग्रामीण भागात लागू नाही, परंतु रहिवासी क्षेत्र जाहीर झाल्यास लागू होऊ शकतो.

### निर्णय बिल्डरांसाठी नाही, तर ६० लाख कुटुंबांसाठी



चर्चेला उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, 'हा कायदा कोणत्याही बिल्डरला फायदा देण्यासाठी आणलेला नसून, राज्यातील जी ६० लाख कुटुंबे लहान तुकड्यांवर घरे बांधून राहत आहेत, त्यांना कायदेशीर मालकी हक्क देण्यासाठी आहे. या निर्णयामुळे कोणत्याही आरक्षणाला धक्का लागणार नाही. १५ ऑक्टोबर २०२४ नंतर कोणालाही नव्याने तुकडा पाडता येणार नाही, मात्र तोपर्यंतच्या नागरिकांना याचा मोठा लाभ मिळेल. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन कार्यवाही करावी,' असे निर्देशही त्यांनी दिले.



महाविकास आघाडीच्या आमदारांनी मंगळवारी विधानसभेच्या पायऱ्यांवर शेतकऱ्यांच्या मुद्यावर आंदोलन केले. कापसाला योग्य भाव मिळावा आणि सोयाबीन खरेदीच्या भावातील फरक त्वरित द्यावा अशी मागणी केली

# बोगस दिव्यांग लाभार्थींविरोधात कारवाई

### अतुल सावे यांनी दिली माहिती

◆ **नागपूर ९ डिसेंबर**

राज्य सरकारच्या विविध विभागात दिव्यांग म्हणून लाभ घेण्यासाठी बोगस प्रमाणपत्र सादर केल्याच्या ७१९ तक्रारी दाखल झाल्या आहे. त्यामुळे या तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवून या संदर्भात कारवाई करण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती राज्याचे दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सोमवारी विधानसभेत दिली.

विधानसभेत आमदार बापूसाहेब पठारे यांनी तारांकित प्रश्न उपस्थित करून, कर्मचारी अधिकाऱ्यांनी आणि अन्य व्यक्तींनी दिव्यांगांचा लाभ घेण्यासाठी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढले असल्याचे सभागृहात सांगितले.

काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनीही अहेरी नगरपरिषद मुख्याधिकारी गणेश शहाणे हे बोगस प्रमाणपत्र दाखल करून एमपीएससी मार्फत नियुक्ती झाली असल्याचे बाब निदर्शनास आणून देत याबाबत शासन कारवाई करत नसल्याची तक्रार केली. यावर उत्तर देताना सावे यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्रांची पडताळणी अनिवार्य करण्यात आली असून, कुठेही अनियमितता आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजारांत घसरण

**मुंबई** : गुंतवणूकदारांनी सावध पावित्रा घेतल्याने मंगळवारी मुंबई शेअर बाजारात सलग दुसऱ्यांदा घसरण झाली. अमेरिकन फेडरल



रिझर्व्हच्या धोरणात्मक निर्णयापूर्वी गुंतवणूकदारांनी नफा कमावण्यावर भर दिला. परिणामी निर्देशांक ४३६.४१ अंकांनी घसरून ८४,६६६.२८ वर बंद झाला. हा दोन आठवड्यांच्या नीचांक पातळीवर बंद झाला. ३० पैकी आठ कंपन्यांचे शेअर्स तेजीत बंद झाले तर २२ कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली. निफ्टी १२०.९० अंकांनी घसरून २५,८३९.६५ वर बंद झाला. निफ्टीतील केवळ १७ कंपन्यांचे शेअर्स वधारले. विदेशी निधी बाहेर जाणे आणि कमकुवत जागतिक संकेत यामुळे गुंतवणूकदारांवर परिणाम झाला असल्याचे विश्लेषकांनी सांगितले.

### मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरच्या इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून चार बंडखोरांना अटक करण्यात आल्याचे मंगळवारी पोलिसांनी सांगितले. सोमवारी अटक करण्यात आलेल्या सर्वांवर खंडणीचा आरोप होता. युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (पाम्बेई) च्या दोन कार्यकर्त्यांना अवांग वाबागाई येथून अटक करण्यात आली. त्यांची ओळख निंगथौजाम नोंगपोकंगनबा मैतेई आणि कोन्थौजाम नेल्सन सिंग अशी आहे. युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (पाम्बेई) ने २०२३ मध्ये केंद्रासोबत शांतता करार केला होता, परंतु या संघटनेचे सदस्य अजूनही खंडणी आणि इतर गुन्ह्यांमध्ये सहभागी आहेत, असे त्यांनी सांगितले. सोशलिस्ट रिव्हॉल्यूशनरी पाटी (कांगलेपाई) च्या दोन सदस्यांनाही अटक करण्यात आली. चुंगखाम नानाओ माचा उर्फ मिटलंग याला निंगथेमकोल येथून आणि अरम्बम थोइथोई सिंग याला चांगंगाई येथून अटक करण्यात आली.

### अनिल अंबानींच्या विरोधात सीबीआयचे गुन्हे

**नवी दिल्ली** : युनियन बँक ऑफ इंडियाला झालेल्या २२८ कोटी रुपयांच्या नुकसानप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात् सीबीआयने उद्योजक अनिल अंबानी यांचा मुलगा जय अनमोल अनिल अंबानी आणि रिलायन्स होम फायनान्स लिमिटेडच्या विरोधात फसवणुकीचे गुन्हे दाखल केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली. सीबीआयने बँकेच्या तक्रारीची दखल घेत रिलायन्स होम फायनान्स लि., जय अनमोल अनिल अंबानी आणि रवींद्र शरद सुधाकर या कंपनीच्या दोन संचालकांच्या विरोधात कारवाई केली. कंपनीने व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी बँकेच्या मुंबईतील एससीएफ शाखेकडून ४५० कोटींची क्रेडिट लिमिट घेतली होती.



# ...तर देशाचे विभाजन टळले असते : अमित शाह




◆ **नवी दिल्ली, ९ डिसेंबर**

काँग्रेसने वंदे मातरमचे दोन तुकडे केले, त्यामुळे देशाचे विभाजन झाले, काँग्रेसने वंदे मातरमचे दोन तुकडे केले नसते, तर देशाचे विभाजन टळले असते, असा घणाघाती हल्ला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज राज्यसभेत चढवला.

वंदेमातरमला १५० वर्श वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राज्यसभेत या विषयावरील विशेष चर्चेत सहभागी होतांना अमित शाह यांनी या मुद्यावरुन पंडित जवाहरलाल नेहरु आणि काँग्रेसचा खरपूस समाचार घेतला. वंदेमातरम राष्ट्राच्या शुध्द आत्म्याशी जुळलेले गीत आहे, असे महात्मा गांधी यांनी म्हटले होते, याकडे लक्ष वेधत शाह म्हणाले की, मात्र काँग्रेसचा सुरुवातीपासुनच वंदे मातरमला विरोध आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांचा तर वंदे मातरम म्हणण्यालाही विरोध होता. अशा नेत्यांची नाव मी सायंकाळपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवायला तयार आहे, त्याला तुम्ही कामकाजात सहभागी करुन घ्यावे. दुसरीकडे वंदे मातरमच्या वेळी भाजपाचे सर्व सदस्य उभे असतात, भाजपा सदस्यांकडून कधीच वंदे मातरमचा अनादर केला जात नाही.

जवाहरलाल नेहरुंनी मुस्लिम तुष्टीकरणासाठी वंदे मातरमचे दोन तुकडे केले, त्याची परिणती देशाच्या फाळणीत झाली, असा आरोप करत शाह म्हणाले की, वंदे मातरमचा विरोध हा नेहरुंपासून काँग्रेसच्या सर्व नेत्यांच्या रक्तात भिनला आहे, त्यामुळे अनेक वेळा सभागृहात वंदे मातरम सुरु असतांना काँग्रेसचे नेते उभे राहात नाही, सभागृहातून निघून जातात. अशा अनेक नेत्यांची नाव मला माहित आहे. (तभा वृत्तसेवा)

### मोदी यांनी देशाची माफी मागावी : खडगे



स्वातंत्र्यासाठी तुरुंगात जाणाऱ्यांचा, देशासाठी बलिदान करणाऱ्यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी अपमान करत आहे, त्यासाठी त्यांनी देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी आज केली. वंदेमातरमवर सभागृहात सुरु असलेल्या चर्चेत सहभागी होत खडगे यांनी गृहमंत्री अमित शाह यांनी केलेले आरोप खोडून काढले. आम्ही स्वातंत्र्याची लढाई लढलो, देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, याकडे लक्ष वेधत खडगे म्हणाले की, आम्ही देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढत होतो, तेव्हा तुम्ही कुठे होता. तुम्ही संविधान न मानणारे आहात. नेहरुंचा अपमान करण्याची एकही संधी मोदी सोडत नाही, शाहही तेच करत आहे, असा आरोप करत खडगे म्हणाले की, नेहरुंना कमी लेखण्याचे काम तुम्ही करत आहात, पण नेहरु देशाचे महान नेते होते आणि महानच राहणार, तुम्ही त्यांच्यापेक्षा सर्वाथाने छोटे आहात, आणि छोटेच राहणार.

# 'निवडणूक सुधारणांना सरकारचाच विरोध'

### राहुल गांधींकडून मतचोरीच्या आरोपांचा पुनरुच्चार

◆ **नवी दिल्ली, ९ डिसेंबर**

निवडणूक सुधारणा आवश्यक असल्या तरी अशा सुधारणा सरकारला मान्य नाहीत, सरकार मतचोरीचे राष्ट्रविरोधी काम करत असल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज लोकसभेत केला.



निवडणूक सुधारणांवर लोकसभेत सुरु झालेल्या चर्चेत सहभागी होत राहुल गांधी यांनी मतचोरीच्या आपल्या आरोपांचा पुनरुच्चार केला. हरयाणा आणि महाराष्ट्रात मतचोरी झाल्याचा आरोप आम्ही सिध्द केला, याकडे लक्ष वेधत गांधी म्हणाले की, बिहारमध्ये एसआयआरनंतर मतदारयादीत १ लाख २२ हजार डुप्लिकेट छायाचित्र छापले आहे. हरयाणातील मतदार यादीत एका ब्राझिलियन महिलेचे छायाचित्र २२ वेळा छापून आले. देशातील निवडणुकींचे संचालन करणाऱ्या निवडणूक आयोगावर सरकारने कब्जा केला आहे, माझ्याजवळ याचे पुरावे आहेत, असा आरोप करत गांधी म्हणाले की, निवडणूक आयोगाला हाताशी धरत देशातील लोकशाही कमजोर करण्याचा प्रयत्न आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना हटवण्यात आले,अशा एका बैठकीत मोदी आणि शाह एका बाजूला तर मी दुसऱ्या बाजूला होतो, असे स्पष्ट करत गांधी म्हणाले की, याआधी कोणत्याही पंतप्रधानाने असे केले नाही. (तभा वृत्तसेवा)

### राहुल गांधींच्या आरोपावर भाजपा सदस्य भडकले

राहुल गांधी यांनी रा. स्व.संघाचे नाव घेत आरोप केल्यामुळे भाजपा सदस्य संतप्त झाले, त्यामुळे सभागृहात गोंधळ उडाला. देशातील सर्व संवैधानिक संस्थावर संघाने कब्जा केला आहे, नाथुराम गोडसे यांनी महात्मा गांधी यांची हत्या केली, असा आरोप गांधी यांनी करताच भाजपा सदस्यांनी त्यावर तीव्र हरकत घेतली. तुम्ही विषयावर धरुन बोला, अन्यथा वेळेचा अपव्यय होईल, असे ते म्हणाले.

# उड्डाणांमध्ये १० टक्के कपात करा

### डीजीसीएचा इंडिगोला आदेश



◆ **नवी दिल्ली/ मुंबई, ९ डिसेंबर**

हिवाळ्याच्या मोसमात उच्च क्षमता असलेल्या मार्गांवरील पूर्वनियोजित उड्डाणांमध्ये १० टक्के कपात करा, असा आदेश नागरी उड्डयन महासंचालनालय अर्थात् डीजीसीएने इंडिगो विमान कंपनीला दिला आहे. सुरक्षा नियमांचे पालन करण्यात अपयशी ठरल्यानंतर हजारो उड्डाणे रद्द केल्यानंतर हा आदेश जारी करण्यात आला आहे.

बुधवारपर्यंत सुधारित वेळापत्रक सादर करा, असे डीजीसीएने ८ डिसेंबर रोजी दिलेल्या आदेशात म्हटले आहे. २०२५-२६ च्या हिवाळी वेळापत्रकाचा भाग म्हणून विमान कंपनी दररोज २,२०० उड्डाणे घेत आहे. इंडिगोचा बाजारहिस्सा ६५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या कंपनीने २ डिसेंबरपासून चार हजार उड्डाणे रद्द केली. त्यामुळे जवळपास दहा हजार प्रवासी रखडले. त्यांना त्यांच्या महत्त्वाच्या कामांसाठी जाता आलेले नाही. या गोंधळानंतर कारवाईचा भाग म्हणून प्राधिकरणाने हा आदेश दिला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत कंपनीने बाहेर जाणारी उड्डाणे ९.६६ टक्क्यांनी वाढवली असल्याचे इंडिगोच्या हिवाळी वेळापत्रकात दिसत आहे. त्याचवेळी उन्हाळी वेळापत्रकात ६.०५ टक्क्यांनी उड्डाणे वाढवल्याचे दिसून आले. मात्र, हे वेळापत्रक कार्यक्षमतेने चालवण्याची क्षमता कंपनीने दाखवलेली नाही, असे डीजीसीएने जारी केलेल्या नवीन नोटीसमध्ये म्हटले आहे.

### इंडिगोच्या विरोधात कठोर कारवाई

नियोजनांचा अभाव आणि नियमांची पायमल्ली करीत प्रवाशांना त्रास देण्याची परवानगी कोणत्याही कंपनीला नाही, असे उड्डयन मंत्री राम मोहन नायडू यांनी मंगळवारी लोकसभेत स्पष्ट केले. या मुद्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# कर्नाटकात मराठी भाषिकांवर दडपशाही

**बेळगाव, ९ डिसेंबर**

कर्नाटक सरकारच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने आयोजित मराठी भाषिक महामेळाव्याला पोलिसांनी परवानगी नाकारली. मराठी भाषिकांनी एकत्र येत लेले मैदानात सरकारचा निषेध केल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. मराठी एकीकरण समितीने लोकशाही हक्काचा आधार घेत मेळावा आयोजित करण्याचा निर्धार केल्यामुळे सध्या बेळगावमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली.

महामेळाव्याच्या आयोजनात अडथळा आणण्यासाठी कर्नाटक पोलिसांनी मंगळवारी पहाटेपासूनच धरपकड सुरू केली. पूर्व खबरदारी म्हणून वॅक्सिन डेपो मैदानाकडे जमा होण्यासाठी येणाऱ्या सर्वच समिती नेत्यांना ताब्यात घेऊन एपीएमसी पोलिस ठाण्यात स्थानबद्ध केले. समितीचे नेते शुभम शेळके, धनंजय पाटील, मनोहर उंदरे यांच्यासह अनेकांना त्यांच्या घरातून ताब्यात घेण्यात आले. समितीचे कार्याध्यक्ष मनोहर किणेकर, सरचिटणीस मालोजीराव अष्टेकर यांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या दडपशाहीला न जुमानता व्हॅक्सिन डेपो मैदानाकडे कूच केली. यावेळी पोलिसांनी



त्यांना मैदानात प्रवेश करण्यापासून रोखले.

महामेळाव्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीने परवानगी मागितली होती. तथापि, प्रशासकीय कारणांमुळे ती मागणी फेटाळली असून, तसे लेखी स्वरूपात आयोजकांना कळविले आहे. नियमांचे उल्लंघन करून मेळावा घेण्याचा प्रयत्न केल्यास कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती बेळगावचे पोलिस आयुक्त भूषण बोरसे यांनी दिली.

लोकशाहीच्या मार्गातून आमचा आंदोलन करण्याचा प्रयत्न सुरूच आहे. महामेळाव्याला विरोध करणे मराठी भाषिकांची दडपशाही असून, आम्ही घाबरणार नाही. महाराष्ट्रातील सर्व पक्षीयांनी दिल्ली दरबारी मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडावी, असे महाराष्ट्र एकीकरण समितीचे प्रकाश मरगाळे यांनी सांगितले.

## बांगलादेशला युनूस यांनी अडकवले कर्जाच्या विळख्यात

**ढाका, ९ डिसेंबर**

अर्थतज्ज्ञ म्हणवले जाणारे मोहम्मद युनूस यांनी बांगलादेशला कर्जाच्या विळख्यात अडकवले आहे. ही माहिती कोणत्या विदेशी यंत्रणेने नव्हे, तर बांगलादेशातील यंत्रणांनीच दिली आहे.

मार्च महिन्यापर्यंत बांगलादेशवर एकूण १९,९९,९२८ टका कर्ज होते. यात ८,४१,९९२ कोटी टका कर्ज विदेशी होते, अशी माहिती बांगलादेशाच्या अर्थ मंत्रालयाने दिली. या कालावधीत देशातील विदेशी गुंतवणूक जवळपास संपुष्टात आल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. बांगलादेश पूर्णतः कर्जाच्या जाळ्यात अडकला आहे. सद्यः स्थितीत बांगलादेशचा सर्वांत मोठा खर्च व्याज देण्यावर होत आहे. कर ते अर्थव्यवस्थेच्या अनुपाताची टक्केवारी घसरून सात टक्क्यांवर आली आहे, बांगलादेश हळूहळू एक धोकादायक आणि अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेकडे जात आहे, असा इशारा राष्ट्रीय महसूल मंडळाचे अध्यक्ष एम. अब्दुर रहमान यांनी येथे आयोजित एका चर्चासत्रात दिला.

# डॉ. बाबा आढाव यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**पुणे, ९ डिसेंबर**

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्या पार्थिवावर येथील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात आले. शासनाच्या वतीने उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले; पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मा. गृहमंत्री मंत्री अनिल देशमुख, मा. राज्यमंत्री रमेश बागवे, मा. आमदार मोहन जोशी, चेतन तुपे, पोलिस उपायुक्त कृषिकेष रावल, उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी प्रामुख्याने उपस्थित होते.



डॉ. बाबा आढाव यांनी खऱ्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचितांसाठी आयुष्य समर्पित केले. रिक्षा पंचायत, हमाल पंचायत, माथाडी, असंघटित कामगारांच्या काही प्रश्नांत त्यांना कठोर भूमिका घ्यावी लागली, असे अजित पवार यांनी सांगितले. छ. शिवाजी महाराज, छ. शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा स्मरणात ठेवून त्यांनी वाटचाल केली, एक संघर्ष योद्धा म्हणून त्यांना महाराष्ट्राने अनुभवले आहे, अशा शब्दांत पवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. डॉ बाबा आढाव यांनी आयुष्यभर मजूर चळवळ, सामाजिक न्याय, वंचित घटकांच्या हक्कासाठी कार्य केले. त्यांच्या स्मृतींना शासकीय सन्मान देण्याचा निर्णय राज्य सरकार ने घेतला असून त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्काराची संपूर्ण प्रक्रिया प्रशासकीय देखरेखीखाली सुसूत्र पद्धातीने करणार आहे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना वंचित आणि असंघटित कामगारांसाठी शक्तीचा आधारस्तंभ म्हणून वर्णन केले. त्यांच्या शोक संदेशात फडणवीस म्हणाले, 'हमाल पंचायत आणि परिवर्तनकारी 'एक गाव, एक पाणी बिंदू' चळवळीसारख्या त्यांच्या उपक्रमांनी कायमस्वरूपी बदल घडवून आणला. सामाजिक दुष्कृत्यांविरुद्ध त्यांनी केलेला लढा नेहमीच लक्षात राहील.'

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# स्मरण समर गीताचे

८ डिसेंबर २०२५ हा दिवस सनातन हिंदुस्थान आणि मातृभूमीला सर्वोपरी मानणाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाचा आणि अंगावर रोमांच आणणारा होता. देशाला स्वातंत्र्य मिळून पाऊणशेहून अधिक वर्षे झाली आहेत. त्या पृष्ठभूमीवर यापूर्वी कधीही साजरा न केला गेलेला उत्सव भारतीय जनमानसाचे प्रतिबिंब असलेल्या पवित्र संसदेत साजरा झाला. निमित्त होते वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे झाल्याचे. १८७५ मध्ये कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी एका भारावलेल्या अवस्थेत वंदे मातरम् हे गीत लिहिले. या गीतात एकूण पाच कडवी आहेत. त्यातील

वंदे मातरम् वंदे मातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतलाम् सस्य श्यामलां मातरम्, वंदे मातरम्
शुभ्र ज्योत्सनाम् पुलकित यामिनीम् फुल्ल कुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनी सुमधुर भाषिणीम्, सुखदां वरदां मातरम्
वंदे मातरम्, वंदे मातरम्

हे कडवे स्वतंत्र, प्रजासत्ताक भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून १९५० साली संसदेत घोषित करण्यात आले. 'जन गण मन' या राष्ट्रगीताच्या समान दर्जा वंदे मातरम् गीताला देण्यात आला. स्वातंत्र्य लढ्याच्या समरात हे गीत गात अनेक ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी प्राणाचे बलिदान दिले. इंग्रजांचा विरोध आणि बंदी असतानाही देशभरात प्रभात फेऱ्यांमधून हे गीत गायिले जात असे. या गीताच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा भाव जागृत करण्याचे काम करण्यात आले. वंदे मातरम्‌चा अर्थ फार सोपा आणि सर्वांना समजणारा आहे. भारतभूची महती या गीतातून सांगण्यात आली आहे.

ख्यातनाम संगीतकार ए. आर. रहमान यांनी वंदे मातरम् या अल्बमच्या माध्यमातून 'वंदे मातरम्... माँ तुझे सलाम' हे गीत गायिले, जे आजही असंख्य राष्ट्रभक्तांच्या ओठी आहे. ए.आर. रहमान यांनी वंदे मातरम्‌चा अर्थ अगदी सोप्या शब्दात सांगितला होता. १९९७ मध्ये स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाल्याच्या निमित्त पं. भीमसेन जोशी यांनी तबला, पेटी घेऊन संसदेत वंदे मातरम् हे गीत गायिले होते. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी जवळपास ५० वर्षे या गीताने भारतीयांच्या मनावर अधिराज्य केले. या गीतातील अपार देशभक्तीच्या भावातून प्रेरणा घेत अनेक क्रांतिवीर फासावर गेले. गेल्या शंभर वर्षांत रवींद्रनाथ टागोर ते ए.आर. रहमान यांच्यापर्यंत अनेक संगीतकार, गीतकारांनी या गीताला चाली दिल्या आहेत. १९५१-५२ नंतर केवळ औपचारिकता म्हणून शासकीय पातळीवर या गीताची दखल घेण्यात आली. चीन आणि पाकिस्तानसोबतच्या युद्धाच्या काळात हे गीत वाजविले गेले. याशिवाय औपचारिकता म्हणून दरवर्षी येणाऱ्या स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाला या गीताचे स्वर कानी पडतात. अन्यथा पूर्वीच्या शासकांनी जणू या समर गीताची उपेक्षाच केली, असे म्हणावे लागेल. पुढे तर या गीताला धर्माशी जोडले गेले. वास्तविक पाहता हे गीत मातृभूमीचे गुणगान करणारे आहे. त्याचा कोणत्याही धर्माशी संबंध नाही. या भूमीचे गुणगान करण्यात कुणालाही हरकत नसावी. पण, दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर देशात धर्माच्या आधारावर असे काही वातावरण तयार करण्यात आले, की वंदे मातरम् हे जणू एखाद्या देवदेवतेची स्तुती अथवा वंदन करणारे गीत असल्याचा समज रुजवला गेला. या भावनेला तत्कालीन सरकारनेही खतपाणी देण्याचे काम केले. वास्तविक पाहता या गीतात या भारतभूला मातेच्या रूपात कल्पित केले आहे एवढेच. दुर्दैवाने काही धर्मांध लोक राष्ट्रप्रेमाच्या ओढीतील मातृ वंदनासारखा थोर भाव ओळखू शकले नाहीत. अशांनी देशापेक्षा धर्माला महत्त्व दिले. एवढी वर्षे उदासीनतेमुळे म्हणा की मरगळ आल्यामुळे म्हणा, बहुसंख्य समाजानेही याकडे दुर्लक्ष केले. पण, परिस्थितीत बदल होतच असतो. २०१४ पासून बहुसंख्यकांसाठी सरकारच्या पातळीवर अनुकूल बदल होण्यास प्रारंभ झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने असे काही निर्णय घेतले आहेत, की ज्यामुळे बहुसंख्य समाजात आत्मविश्वास निर्माण होऊन ते आपल्या भावना सार्वजनिकपणे प्रकट करू लागले आहेत.

वंदे मातरम् गीतावर संसदेत चर्चा घडवून आणण्याचा निर्णय हा त्यामुळे साऱ्यांना सुखावणारा ठरला आहे. या गीताची महती ओळखून त्याचे स्मरण करण्यासाठी आणि नव्या-जुन्या पिढीला त्याचे महत्त्व सांगण्यासाठी संसदेत या गीतावर चर्चेचे आयोजन करण्यात आले. ८ डिसेंबरला बरोबर बाराच्या ठोक्याला लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चर्चेला सुरुवात केली. राष्ट्रवादावर मोदींचे भाषण म्हणजे ऐकणाऱ्यांचे मन आणि कान तृप्त झाल्याशिवाय राहत नाहीत. वंदे मातरम्‌चा इतिहास सांगताना त्यांनी काँग्रेस आणि विरोधकांचे अक्षरशः वाभाडेच काढले. या गीताला विरोध करता करता देशाच्या विभाजनाची बीजे कशी रोवली गेली, हे सांगताना त्यांनी गीताचे तुकडे करण्याबरोबच देशाचे तुकडे होण्यास तत्कालीन काँग्रेस आणि या पक्षाचे नेते कसे कारणीभूत होते हेही सांगितले. मोदींचे भाषण सुरू असताना काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि डाव्या पक्षांनी गदारोळ करणे सुरू ठेवले. पण, मोदींच्या कोणत्याही मुद्यांचे त्यांच्याकडे उत्तर नव्हते. कारण, मतांसाठी अल्पसंख्यक आणि हिंदुविरोधी मतांवर अवलंबून असलेले लोक खुल्या मनाने वंदे मातरम्‌चे समर्थनही करू शकत नव्हते. वंदे मातरम्‌ऐवजी ते सरकार कसे चुकीचे करीत आहे यावर बोलून वेळकाढूपणा करीत होते. एरवी अघळपघळ बोलून पक्षाला अडचणीत आणण्यात हातखंडा असलेले राहुल गांधी तर सभागृहातच नव्हते. लोकसभेतील विरोधी पक्षनेता सभागृहात नसणे म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याप्रमाणेच आताचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचाही वंदे मातरम्‌ला विरोध आहे की काय, अशी शंका येते. काँग्रेसकडून प्रियांका वढेरा यांनी भाषण केले; पण त्यांनी तर कहर अधिक केला. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणूक होणार असल्याने संसदेत ही चर्चा घडवून आणली जात असल्याचे सांगत आता वंदे मातरम्‌वर चर्चा करण्याची गरज काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तुष्टीकरणासाठी काँग्रेस कोणत्या थराला जाऊ शकते, हेच त्यातून दिसून आले. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये निवडणुका येणे आणि वंदे मातरम्‌ला दीडशे वर्षे पूर्ण होणे याचा काहीच संबंध नाही. असा योग कृत्रिमपणे जुळवता येत नाही. गीताला ५० वर्षे झाली तेव्हा देश पारतंत्र्यात होता; तर शंभर वर्षे झाली तेव्हा देशात आणिबाणी सुरू होती. लोकशाहीचा गळा घोटण्यात आला होता. आता दशकभरापासून केंद्रात राष्ट्रवादी विचारांचे सरकार सत्तेत असल्याने आज या गीताचे महत्त्व युवा पिढीला समजावून सांगितले जात आहे. त्यात वावगे ते काय?

आपल्या ऐतिहासिक वारशाची हेटाळणी करण्याचे काम काँग्रेस पक्ष करीत आला आहे. मोदी सरकारने राष्ट्रगीतावर संसदेत चर्चा घडवून आणत येणाऱ्या पिढ्यांना वंदे मातरम्‌चे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने विरोधक याचेही राजकारण करीत आहेत. बंकिमचंद्र चटर्जी यांचे पाचव्या पिढीतील वंशज सजल चटर्जी हे कोलकाता येथील शोभा बाजारात राहतात. स्वातंत्र्यानंतर बंकिमबाबूंची बहुतांश मालमत्ता वारसा म्हणून घोषित करण्यात आली. कोलकाता येथील बंकिमबाबू यांच्या घराचे ग्रंथालयात रूपांतर करण्यात आले. मात्र, त्या घराची आता दुरवस्था झाली असून या ग्रंथालयाच्या आसपास कचरा साचला आहे. हे दृश्य मनाला वेदना देणारे आहे. आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जात असताना या गीताचे कर्ते असलेल्या बंकिमबाबूंच्या वंशजांना कुणी विचारायला तयार नाही. आम्ही कसे आहोत याची चौकशीही बंगाल सरकार करीत नाही, अशी खंत सजल चटर्जी यांनी व्यक्त केली. स्वातंत्र्यानंतर बंगालमध्ये १९७७ पर्यंत काँग्रेसची सत्ता होती. त्यानंतर पुढील ३५ वर्षे हा प्रांत डाव्यांच्या हातात होता. २०११ पासून काँग्रेसपासून फुटून वेगळ्या झालेल्या तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. डाव्यांचा तर वंदे मातरम्‌ला विरोध आहेच; पण त्यापूर्वी काँग्रेस सरकारनेही वंदे मातरम् गीताकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. सुदैवाने देशाला नरेंद्र मोदी यांच्या रूपाने एक राष्ट्रवादी विचारांचे पंतप्रधान लाभल्याने वंदे मातरम्‌चे स्मरण करण्याचे सौभाग्य सर्वांना लाभले आहे. त्याचा आनंद आणि अभिमान प्रत्येक देशभक्ताला वाटेलच.

## विशेष

# राममंदिर बांधणीतील वैज्ञानिक चमत्कार

**प्रा. सुखदेव बखळे**

अयोध्येतील राम मंदिर हे केवळ श्रद्धेचे प्रतीक नाही, तर आधुनिक अभियांत्रिकी आणि प्राचीन कारागिरीचे मिश्रण आहे, ज्याचा जग येणारी शतकानुशतके अभ्यास करेल. गर्भगृहापासून शिखरापर्यंत, प्रत्येक पायरी, प्रत्येक दगड, प्रत्येक कोरीव काम आणि प्रत्येक शिखरावर एक वैज्ञानिक चमत्कार लपलेला आहे जो जगाला आश्चर्यचकित करतो. गर्भगृहापासून शिखरापर्यंत राममंदिर जितके भव्य आहे, तितकाच तो चमत्कार आहे. प्रत्येक कणात विज्ञान आहे. धार्मिक ध्वज फडकवल्यानंतर राम जन्मभूमी मंदिर अखेर पूर्ण झाले आणि लोकांनी त्यासाठी झालेल्या चळवळीबद्दल, त्यानिमित्ताने झालेल्या राजकारणाबद्दल, रामाच्या कथा आणि श्रद्धेबद्दल खूप चर्चा केली. चर्चा झाली, गाणी गायली गेली आणि आनंद व्यक्त केला गेला; पण आणखी एक मुद्दा सर्व भारतीयांना आणि जगभरातील लोकांना माहीत हवा की, धर्म आणि श्रद्धा यांचे स्थान आहे; पण त्याची वास्तुकला, वास्तुशास्त्र, त्याची रचना; प्रत्येक गोष्ट खरोखर समजून घेणे आणि अभ्यासणे आवश्यक आहे. जगभरातील आघाडीचे नागरी आणि संरचनात्मक अभियांत्रिकी आणि वास्तुकला तज्ज्ञ याचा अभ्यास करत आहेत आणि शतकानुशतके ते करत राहतील. अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या शिखरावर १९१ फूट उंच भगवा ध्वज फडकला आहे. सामान्य लोक मंदिराला फक्त श्रद्धेचे प्रतीक मानतात; परंतु त्यामागील वैज्ञानिक विचारसरणीचाही विचार करणे आवश्यक आहे.

उत्तर भारतात मंदिराच्या रचनेची एक प्राचीन शैली आहे, तिला नागर शैली म्हणतात. हे मंदिरदेखील नागर शैलीत बांधले गेले आहे. नागर शैलीतील मंदिराचे शिखर खूप उंच आणि टोकदार आहे. आपण वर जाताना, शिखर टोकदार बनते आणि शिखराच्या वरच्या बाजूला अमलक नावाचा एक गोल दगड असतो. त्यावर एक कलश ठेवला जातो. प्राचीन काळात, हा कलश सोन्याचा किंवा चांदीचा बनवला जात असे. राम मंदिराच्या प्रत्येक शिखरावर एकच गोष्ट आहे, एक गोल दगड आणि एक कलश. धर्मध्वजदेखील सर्वांत उंच शिखरावर उभारण्यात आला आहे. म्हणून, नागर शैली त्याच्या शिखरावरून ओळखली जाते. नागर शैलीचा दुसरा मुख्य मुद्दा म्हणजे गर्भगृह चौकोनी आहे. दक्षिण भारतातील मंदिरे पाहिली असतील, तर गर्भगृह आयताकृती आहे आणि नागर शैलीमध्ये ते चौकोनी आहे. त्याचप्रमाणे, राम मंदिरातील गर्भगृह चौकोनी आहे. नागर शैलीत मंदिर जमिनीपासून उंचावर, म्हणजेच एका व्यासपीठावर बांधले आहे. यामुळे मंदिर केवळ दुरूनच दिसत नाही, तर पुराच्या पाण्यापासूनही दूर राहते. अयोध्या शहर शरयू नदीकाठी वसले आहे. आज पुराचा धोका नसला, तरी मंदिर एक हजार वर्षे टिकेल असे बांधले गेले आहे. राम मंदिर परिसरात अनेक लहान शिखरे आहेत. गर्भगृहाचे शिखर खूप उंच आहे; परंतु भाविक जिथे उभे असतात, त्या समोरील मंडप त्याच्या अर्ध्या उंचीचा आहे. राम मंदिरातील नृत्य मंडप आणि रंग मंडप सर्व सारखेच आहेत. नागरा



शैलीमध्ये गर्भगृहाच्या आतील छतावर फिरत्या फुलांसारख्या डिझाईन आहेत. त्यांना 'कुंड' किंवा 'पद्म' म्हणतात. वास्तुशास्त्रानुसार, मंदिराचे तोंड पूर्वेकडे आहे. त्यामुळे सूर्योदयाच्या वेळी सूर्याची किरणे थेट मंदिरावर पडतात. सूर्योदयाच्या वेळी वर्षभर सूर्याची स्थिती बदलते, पण मंदिर बदलणार नाही. म्हणून, रामजन्मभूमी मंदिराची रचना अशा प्रकारे करण्यात आली आहे, की रामनवमीच्या दिवशी सूर्याची किरणे थेट रामलल्लावर पडतील. मंदिराची दिशा बारकाईने मोजणी करून निश्चित करण्यात आली. नागर शैली ही गुप्त काळातील पाचव्या शतकातील आहे. राम मंदिराचे मुख्य शिखर १२८ फूट उंच आहे आणि तीन मोठे शिखर आहेत. संपूर्ण मंदिर ३६० फूट लांब, २३५ फूट रुंद आणि १६१ फूट उंच आहे. त्यात तीन मजले आहेत. प्रत्येकी २० फूट उंच. त्यात ३९२ खांब आणि ४४ दरवाजे आहेत. प्रत्येक खांब आणि भिंतीवर देवता, फुले, प्राणी आणि रामायणातील कथा कोरलेल्या आहेत. मंदिराची रचना १५ पिढ्यांपासून मंदिर बांधकामात तज्ज्ञ असलेल्या सोमपुरा कुटुंबाने केली. चंद्रकांत सोमपुरा यांनी १९८८ मध्ये पहिली रचना तयार केली. त्यांच्या मुलांनी २०२० मध्ये ती अद्ययावत केली. मंदिराची मांडणी पृथ्वी, पाणी, अग्नी वायू आणि आकाश या पाच घटकांवर आधारित आहे. मंदिराचा ईशान्य कोपरा हवा आणि पाण्याच्या प्रवाहासाठी खुला ठेवला आहे. याचे केवळ आध्यात्मिक परिणाम नाहीत, तर अभियांत्रिकी दृष्टिकोनातूनही पुराचा धोका कमी होतो. नागर शैलीसोबतच मंदिरात दक्षिण भारतातील द्रविड शैलीचे घटकदेखील समाविष्ट आहेत. जसे की, रामेश्वरम आणि तिरुपतीच्या मंदिरांपासून प्रेरित कोरीवकाम.

प्रभू राम संपूर्ण भारतीय उपखंडाचे प्रतिनिधित्व करत असल्याने डिझाईन संपूर्ण भारतीय आहे. ही रचना तयार करण्यासाठी प्रगत 'बीआयएम' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. 'बीआयएम' म्हणजे 'बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग'. याचा अर्थ बांधकामापूर्वी एक थ्रीडी मॉडेल तयार करण्यात आले होते. संपूर्ण मंदिर तयार केले गेले आणि संगणकावर सत्यापित केले गेले. प्रत्येक दगडाची जागा पूर्वनिर्धारित होती. बांधकामात लोखंड किंवा स्टीलचा वापर केला गेला नाही. कारण लोखंडाचे आयुष्य फक्त ८०-९० वर्षे असते. ते ओलाव्यामुळे गंजू शकते. राममंदिर एक हजार वर्षे टिकेल, असे डिझाईन केले आहे. म्हणूनच मंदिरासाठी खास दगड निवडण्यात आले. मुख्य दगड राजस्थानमधील बन्सी पहाडपूर येथून आले होते. त्यांना गुलाबी वाळूचा खडक म्हणतात. त्यात वाळूचे ३२ हजार आठशे खडक आहेत. प्रत्येकाचे वजन दोन टन आहे. त्यांच्या खाली २०,७०० मोठे ग्रॅनाईट ब्लॉक आहेत, जे दक्षिण भारतातून आले होते. वाळूच्या खडकात खूप जास्त दाब असतो. म्हणजे, तो इतर दगडांपेक्षा जास्त दाब सहन करू शकतो. भूकंपाच्या वेळी हा दगड धातूपेक्षा अधिक लवचीक ठरतो, कारण तो कंपन शोषून घेतो. म्हणूनच तो निवडण्यात आला. याव्यतिरिक्त 'राम शिला' आहेत. त्यावर 'श्री राम' असे लिहिलेल्या विशेष विटा. त्या चुना आणि मातीपासून बनवल्या आहेत. त्या मजबूत असतात. पण खास गोष्ट म्हणजे दगड जोडण्यासाठी सिमेंटचा वापर करण्यात आला नाही. दगडांना जोडण्यासाठी 'कुलूप आणि चावी' तंत्राचा वापर करण्यात आला. भूकंपाच्या वेळी दगड एकमेकांशी जोडलेले असतात; जेणेकरून ते वेगळे होणार नाहीत. सांधे कधीही तुटणार नाहीत, कारण दगड एकमेकांशी जोडलेले असतात. ही तंत्रेदेखील आपल्या प्राचीन वास्तुकलेतून आली आहेत; परंतु आधुनिक अभियांत्रिकीद्वारे परिपूर्ण केली गेली आहेत. यामुळे संपूर्ण रचना दगडासारखी मजबूत होते. मंदिर शरयू नदीजवळ असल्याने पाण्याची पातळी उंच आहे आणि मातीचा वरचा भाग चिकणमाती आहे. अशा मातीवर जड संरचना अस्थिर असू शकतात. आयआयटी चेन्नईच्या तज्ज्ञांनी १५ मीटर खोलीपर्यंत खोदण्याची शिफारस केली. त्यानुसार, एक लाख ३२,२१९ घनमीटर मातीचे उत्खनन करण्यात आले. त्यानंतर एक कृत्रिम पाया बांधण्यात आला. रोलर-कॉम्पॅक्टेड काँक्रीटचा १४-१५ मीटर जाडीचा थर म्हणजेच १४-१५ मीटर आरसीसी पाया तयार करण्यात आला. हा काँक्रीटचा थर आहे जो फ्लाय ॲश, चिकणमाती आणि रसायनांपासून बनवला जातो. तो रोलरने दाबून कडक करण्यात आला. काँक्रीटचे चौपन्न ते छप्पन्न थर पायावर लावण्यात आले. त्याची संकुचित शक्ती ६० एन/मिमीपेक्षा जास्त आहे, म्हणजेच ते प्रति चौरस मिलिमीटर ६० किलोग्रॅम वजन सहन करू शकते. या पायावर २१ फूट जाडीचा ग्रॅनाईट प्लिंथ ठेवण्यात आला आहे, जो त्याला आर्द्रतेपासून वाचवतो. याचा अर्थ हा पाया एक हजार वर्षे टिकू शकतो. आणि तो मंदिराच्या लाखो टनांचे वजन सहजपणे सहन करेल. राम मंदिराची सर्वांत मोठी वैज्ञानिक कामगिरी म्हणजे आठ रिश्टर स्केलच्या भूकंपांना तोंड देण्याची क्षमता. एका अंदाजानुसार या भागात दर २५०० वर्षांनी एकदा ८ रिश्टर स्केलचा भूकंप होतो. तसा तो झाला तरी मंदिराला कोणतीही हानी पोहोचणार नाही.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# आठ दशकांची लगबग थांबली!

**विजय निचकवडे**

श्रमिक आणि असंघटितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्यांच्या मांदियाळीत अनेक जण आपल्यास त्यांच्या कर्तृत्वाने खुणावून जातात. पण कायम स्मरणात राहणारे काही मोजकेच! महाराष्ट्राच्या श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ म्हणून ज्यांनी स्वतःला सिद्ध केले असे डॉ. बाबा आढाव यांचे जाणे असंघटित कामगारांचे पितृछत्र हरपल्यासारखे आहे. ८० वर्षे कष्टकऱ्यांसाठी दिलेला लढा आणि त्यातील एक एक आंदोलन बाबांच्या संघटन सामर्थ्याची ओळख देते.

कामगारांचे अनेक नेते महाराष्ट्राला लाभले. कामगारांच्या भल्यासाठी रस्त्यावर उतरून रान पेटविणारे महाराष्ट्राने पाहिले पण जिद्द, चिकाटी आणि सचोटीने लढा देत श्रमिक, असंघटित, शोषितांना शेवटच्या क्षणापर्यंत जपणारे म्हणून डॉ. बाबा आढाव हे नक्कीच स्मरणात राहतील. सुमारे ८० वर्षांची कारकीर्द त्यांनी आपल्या संघटनकौशल्य, ताठरबाणा आणि असंघटितांच्या न्याय्य हक्कासाठी घालविली. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ म्हणून उदयास आलेल्या बाबा आढाव यांनी गांधीजींच्या चले जाव आंदोलनातून सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यावेळी ते शालेय जीवन जगत होते. वैद्यकीय शिक्षण घेत, वैद्यकीय सेवा काही काळ दिल्यानंतर असंघटित कामगारांचे दुःख त्यांना अस्वस्थ करू लागले आणि तेथूनच त्यांच्या नेतृत्वाने वेगळे वळण घेतले. असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि निवृत्ती वेतन मिळावे हा त्यांचा आग्रह होता आणि याच धर्तीवर त्यांचा कामगार नेते म्हणून प्रवास सुरू झाला. त्यांच्यात असलेल्या प्रतिभेच्या जोरावर शांततेच्या मार्गाने अनेक आंदोलने यशस्वी करीत त्यांनी कष्टकऱ्यांना न्याय दिला. शांततेच्या मार्गाने केलेल्या आंदोलनातून व्यवस्थेला झुकविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. असंख्य असंघटित कामगारांचे संघटन करून त्यांना एकसंध ठेवीत त्यांच्यासाठी लढण्याची प्रतिभा वेळोवेळी त्यांच्या आंदोलनातून दिसून आली. म्हणून असंघटित श्रमिकांचे पिता म्हणूनही त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती.

सरकार, सत्ता याचा जराही परिणाम त्यांच्यावर होत नसे! म्हणूनच तर धरणग्रस्तांसाठी यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात तर पाठ्यपुस्तकात साईबाबांचे धडे येऊ नये म्हणून शंकरराव चव्हाण यांच्या विरोधात आंदोलन करण्याचे धाडस त्यांनी दाखविले. यशवंतराव चव्हाण ते शंकरराव चव्हाण अशा दोन्ही मुख्यमंत्र्यांच्या कालखंडात संघर्षाचा विस्तृत पट लिहिण्याचे काम त्यांनी केले.

वडील राजकुमारजी आई निर्मलाबाई थोरले बंधू स्वप्नीलभै वाहिनी तृप्ती पत्नी आरती आणि लहान भाऊ पियुष जो अमेरिका रिटर्न आहे, पुण्यात स्थायिक झाले आहेत. आम्ही १५जण चुलतेसह असे सर्व मिळून सोलापुरात एकत्र राहतो. २००१ ते २००८ या काळात व्यवसाय वाढवण्यावर भर दिला. २००४ मध्ये विवाह, २००६ मध्ये कन्या इशाचा जन्म आणि २०१४ मध्ये इराचा जन्म. १९९६ पासूनची फर्म आता आधुनिक शॉप म्हणून नावाजली. हिंदुस्थान लिव्हर, डाबर, विप्रो, पी अँड जी, अशा ब्रँड्ससोबत अधिकृत शॉपी जुळले. विक्री करता करता २०१६ पासून उत्पादनामध्ये काम चालू केले. २९ वर्षांच्या या प्रवासात दुकानात चोरीची घटना, आग लागण्याची घटना अशा संकटांचा सामना केला. पण धीर सोडला नाही. 'आपण सलामत तर सगळं जग जिंकू' हाच मंत्र. यशस्वी व्यवसायिक आणि उत्पादक नात्याने नवीन युवकांना नोकऱ्यांच्या मागे न धावता व्यवसायातील नवीन संधी या उपक्रमाखाली कॉमर्स कॉलेजमधून मार्गदर्शन शिबिरं झाली. २०१८ पासून ऑर्गेनिक फार्मिंग सुरू केलं. शेत सुधारणा, शेतीकामाचा अनुभव मिळाला.

### वैयक्तिक रेकॉर्ड्स

| | |
|---|---|
| १० किलोमीटर | ४५ मिनिटे |
| हाफ मॅरेथॉन | १:३७ तास |
| १५ ऑगस्ट २०२२(अमृत महोत्सव) | ७५ किलोमीटर पूर्ण |
| १५ ऑगस्ट २०२३ | ७६ किलोमीटर पूर्ण |
| मुंबई फुल्ल मॅरेथॉन | ३:३८ तास |
| राजस्थान बॉर्डर अल्ट्रा रेस २०२४ | १०० कि.मी. पूर्ण |
| ५ किमी, १५ ओपस्टिकल रेस डेव्हील सर्किट २०२५ | १:३० मी.मध्ये पूर्ण. |

### विविध संस्थांकडून सन्मान

सोलापूर रनर्स असोसिएशनकडून 'सिरीयस रनर ऑफ दि इयर २०१९' नावाने सन्मान झाला. सन्मती सेवा दल (महाराष्ट्र) तर्फे ७६ किमी वर्ल्ड रेकॉर्ड साठी. महाराष्ट्र युथ आयकॉन २०२४ पुरस्कार दौंड येथे तसेच २०२५ मध्ये भ. आदिनाथ ट्रस्ट सोलापूर तर्फे सत्कार करण्यात आला. ज्या जैन गुरुकुल शाळेत शिकलो त्याच शाळेत २६ जानेवारी २०२४ला प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविले. तसेच इतर शाळेत क्रीडा बक्षीस वितरण साठी प्रमुख पाहुणेचा मान देण्यात आला. लहान मुलांना प्रोत्साहन करण्यास खूप आनंद मिळाला. देवेंद्र विद्यालय अशोक चौक, दमाणी विद्यालय सम्राट चौक येथेचही २६ जानेवारी क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण करण्याचा लाभ मिळाला. मुलखावेगळी माणसे या कार्यक्रमात सोलापूर आकाशवाणी येथे ~~मुलाखत झाली. विविध शास्त्रीय, सुगम, सरोद, व्हायोलीन तसेच~~ तबला सोलो, लाईव्ह कार्यक्रम आणि आकाशवाणी रेकॉर्डिंग झाले.

### सामाजिक दायित्व

भटके विमुक्त विकास परिषद यमगरवाडी धाराशिव, संभव फाउंडेशन, नेचर कॉन्व्हर सर्कल, गो रक्षण संवर्धन तसेच धार्मिक, संयोग मिळेल ती जबाबदारी स्वीकारून काम चालू ठेवले. संपूर्ण ॲक्टिव्हिटी ही पूर्ण शाकाहारी डाएटवर असून मानवी आहार शाकाहार याला प्रमोट करतो. २०२५ मध्ये शारीरिक रचना, व्यायाम तंत्र या विषयातून फर्स्ट क्लास मार्क्सने पूर्ण केले. चँलेजर स्पोर्ट्स फाउंडेशनची स्थापना २०२२ मध्ये करताना कासव गतीने यशस्वी वाटचाल करत २०२५ला अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली फाउंडेशनची नोंदणी केली. मित्र चंद्रशेखर गायकवाड यांनी साथ दिली. ही एक शासकीय नोंदणीकृत संस्था आहे. याचे उद्देश खेळ आणि सामाजिक उपक्रम ज्यातून निरोगी, तंदुरुस्त आरोग्याची चळवळ सतत तेवत ठेवणे. तसेच या माध्यमातून जागतिक स्तरावरील वक्ते बोलावले जातात आणि रनर्सना मार्गदर्शन दिले जाते. १५ ऑगस्टचा सोलापूर अल्ट्रा आझादी रन आतापर्यंत फाउंडेशनमार्फत हजारो रनर्सचा सहभाग लाभला आहे. हजारपेक्षा जास्त ई-सर्टिफिकेट्स, ३ लाखांपेक्षा जास्त बक्षीसे, शेकडो खेळाडूंना 'सोलापूर फिटनेस आयकॉन' नावाने सन्मान चिन्ह वितरण केले गेले आहे. यामुळे रनर्सना प्रोत्साहन मिळत राहिले आहे



गरीब होतकरू रनर्सना किट वाटप आणि मोफत मार्गदर्शन शिबीरं, सरकारी शाळांमधून नवीन रनर्स तयार करणे हा पुढील उद्देश ठेवून याचे नियोजन चालू आहे. आधुनिक जमान्यात ऑनलाईन पद्धतीने रनिंग स्पर्धा/उपक्रम देखील घेतले गेले.

सोलापूर आणि बाहेर असणाऱ्या शिकाऊ रनर्सना ऑनलाईन पद्धतीने कोचिंग केलं जातं. शेड्युल प्लॅन दिला जातो. रनिंग, डाएट, प्रॅक्टिस संदर्भत जागतिक दर्जाचे जसे ग्रीनीज वर्ल्ड रेकॉर्डर आशिष कसोडेकर २०२३, अमेरिकेत सर्टिफिकेट कोर्से झालेले अनिरुद्ध अथनी २०२५, या दर्जेचे व्यक्ती बोलावून दरवर्षी नोव्हेंबर मध्ये वर्कशॉप ठेवले जाते. १९९५ आणि १९९७ दोन वेळा शहरस्तरावर शिवकालीन, मोघळकालीन,स्वातंत्र्यपूर्व, नंतरचे दुमिर्ळ, परदेशी नाणी, नोटा यांचे प्रदर्शन भरविले.

**आज मी फक्त व्यापारी नाही. मी अल्ट्रामॅरेथॉन धावपटू, संगीतकार, फिटनेस प्रशिक्षक , संग्रहकार, कुटुंब सदस्य आणि शेकडो लोकांसाठी प्रेरणास्थान आहे. या सर्व प्रवासाचे श्रेय मी माझे सर्व कुटुंब आई- वडील थोरले बंधू, पत्नी यांना देतो. कारण ह्या सर्व घटना साठी मला यांनीच खूप मदत केली. 'जिद्द, शिस्त आणि संकल्प' हाच माझा मॅरेथॉन मंत्र.' शरीर निरोगी, मन समाधानी आणि समाजाशी बांधिलकी कायम ठेवणं हीच खरी शर्यत आहे.**

## महत्वाचे...



## सद्गुरुंना स्मरण कर्म करा : मोहनबुवा रामदासी

**सांगोला, दि.९ डिसेंबर-**

आपल्या सद्गुरुंना कधी आनंद वाटेल जेव्हा आपला देह प्रारब्ध आनंदाने भोगू लागतो तेव्हा त्यांना आनंद वाटतो. सद्गुरूंना प्रारब्ध चुकले नाही किंवा कुठल्याही संतांना प्रारब्ध चुकले नाही म्हणून कुठलेही कर्म करताना सद्गुरूंचे मनापासून नाम घ्या ते कायम आपल्या पाठीशी असतात, असे प्रतिपादन समर्थभक्त मोहनबुवा रामदासी यांनी केले. ते श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या ११२ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त नामसाधना मंडळ यांच्यातर्फे ध्यानमंदिर येथे आयोजित केलेल्या प्रवचन मालिकेत बोलत होते. पुढे बोलताना मोहनबुवा रामदासी म्हणाले, गोंदवले या ठिकाणी गेल्यानंतर जो अनुभव येतो तोच अनुभव सांगोलाच्या ध्यानमंदिरात आला. महाराज म्हणतात त्याप्रमाणे जेथे नाम तेथे माझे प्राण असल्याचे ध्यानमंदिरात जाणवले. महाराज ज्यांच्या हाती माळ देतात त्यांची सर्व जबाबदारी ते घेतात, तेव्हा त्यांच्यावर श्रद्धा ठेवून प्रपंच व परमार्थ करावा असेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धांचे विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षीस वितरण समारंभ त्यांच्या हस्ते संपन्न झाले.



## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

सोलापूर येथे नियोजित सेवानिवृत्त संपर्क कार्यालायच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या बैठकीच्या निमित्त श्री. जनार्दन वाघमारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गुणगौरव उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा आण्णासाहेब बनसोडे यांनी केला. तसेच बनसोडे यांनी बोलताना सांगितलं की वाघमारे नेहमीच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोनातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असतात. त्याचबरोबर आपण समाजात राहत असताना समाजाप्रती नेहमीच विकास करण्याचा ध्येय उराशी बाळगून कार्य करत असतात. त्यामुळे शैक्षणिक व सामाजिक कार्याची गुणवत्ता लक्षात घेऊन आण्णासाहेब बनसोडे साहेब यांनी पुष्पगुच्छ देऊन कार्याचा गौरव केला.

## संत चोखामेळा यांचे १६वे वंशज ह.भ.प. माधव सर्वगोड यांचे निधन

**पंढरपूर, दि. ९ डिसेंबर-**



श्री संत शिरोमणी चोखामेळा यांचे १६ वे वंशज ह.भ.प माधव सीताराम सर्वगोड महाराज (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने त्यांच्या मूळ गावी पंढरपुर येथे निधन झाले. सोमवारी पंढरपूर येथील भूवैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली आणि सुना नातवंडे असा परिवार आहे. संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून सामाजिक विषमतेवर प्रहार करत विठ्ठलभक्तीच्या माध्यमातून समानता व आत्मविकासाचा संदेश दिला. चोखोबा हे वारकरी परंपरेतील एक महत्त्वाचे संत असून त्यांनी अस्पृश्यता झुगारून भक्तीमार्गात स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले. त्यांचे जीवन आणि शिकवण आजही वारकरी संप्रदायासाठी प्रेरणास्थान आहे. त्यांच्या शिकवणीवर त्यांचे सोळावे वंशज मानले जाणारे हभप माधव महाराज सर्वगोड यांनी काम करण्याचा प्रयत्न केला होता.

## सेवानिवृत्त शिक्षकाच्या घरी १ लाख ६४ हजारांची चोरी

**मंगळवेढा, दि. ९ डिसेंबर-**

शहरातील एका सेवानिवृत्त शिक्षक फॅमिली देवदर्शनाला गेल्याची संधी साधून चोरट्यांनी कुलूप तोडून घरात प्रवेश करुन लोखंडी कपाटात ठेवलेले रोख रक्कम व दागिने असा १ लाख ६४ हजार ५०० रुपये किंमतीचा मद्देमाल चोरुन नेला. या प्रकरणी अज्ञाताविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी सुनिल खंदारे हे सेवानिवृत्त शिक्षक असून ७ डिसेंबर रोजी ते घराची वास्तुशांती असल्याने ते कुटुंबासहीत परगावी गेले होते. ही संधी साधून चोरट्यांनी मध्यरात्री घराचे दरवाजाचे कुलूप कापून घरात प्रवेश करुन बेडरुममधील कपाटाचे दरवाजे व लॉकर तोडून कपाटात ठेवलेली ४० हजार रुपये रोख रक्कम तसेच ९९ हजार ६०० रुपयाचे वेल व टॉप्स जोडी, २४ हजार ९०० रुपये किंमतीच्या एक सोन्याची टॉप्स जोडी असा १ लाख ६४ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जोग हे करीत आहेत.

## निधन वृत्त...

### मंगल नलवडे



**सांगोला, दि. ९ डिसेंबर-**

शिरभावी (ता. सांगोला) येथील माजी पं. स. सदस्या मंगल शहाजीराव नलवडे (वय-६५) यांचे मंगळावर दि. ९ डिसेंबर रोजी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सांगोला सूतगिरणीचे संचालक शहाजीराव नलवडे यांच्या त्या पत्नी होत्या.

# ‘मविआ’चा महापौर बसवण्याचे लक्ष्य ठेवू : माजी मंत्री चंद्रकांत खैरे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**



महाविकास आघाडीचा महापौर सोलापूर महानगरपालिकेत बसवण्याचे लक्ष्य ठेवून आम्ही लढणार आहोत. आगामी निवडणुकीत रंगतदार सामना पाहायला मिळणार आहे. महाविकास आघाडीतील एकत्रित ताकद दाखवू. काँग्रेस, मनसे, राष्ट्रवादी, कम्युनिस्ट पार्टी, समाजवादी पार्टी आणि वंचित बहुजन आघाडी यांनी एकत्र येत भाजपाविरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतल्याचे शिवसेना उभाठा गटाचे माजी मंत्री चंद्रकांत खैरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

शासकीय विश्रामगृहात मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी महाविकास आघाडीची एकजूट आणि आगामी निवडणूक रणनीती स्पष्ट केली. या सर्व पक्षांच्या पाठिंब्यामुळे भारतीय जनता पार्टीचा पराभव निश्चित असून सत्ता परिवर्तन घडवण्याचा आत्मविश्वास खैरे यांनी व्यक्त केला. त्यांनी स्पष्ट केले की, या निवडणुकीत महाविकास आघाडी एका धाग्यात बांधून लढणार असून सोलापूरच्या विकासासाठी एकत्रित आवाज बुलंद केला जाणार आहे.

यावेळी काँग्रेस, मनसे, राष्ट्रवादी, कम्युनिस्ट पार्टी, समाजवादी पार्टी आणि वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*स्व.डॉ.बाबा आढाव म्हणजे चळवळीतलं व्यक्तिमत्त्व. कष्टकऱ्यांचे नेते हीच त्यांची ओळख बनली होती. एका बाजूला कष्टकऱ्यांच्या घामाला न्याय मिळवून देण्यासाठी, माणूस म्हणून त्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी तर दुसरीकडे समाजात सत्यशोधक विचार रुजविण्यासाठी ते अखेरच्या श्वासापर्यंत सक्रिय राहिले होते. ‘कष्टकऱ्यांचा झरा, आहे मुळिचाची खरा’! असे त्यांच्याबाबतीत म्हटले तर ते वावगे ठरु नये.*

# कष्टकऱ्यांचा झरा, आहे मुळिचाची खरा!

स्व.डॉ.बाबा आढाव यांच्या आंदोलनांचा इतिहास तसा खूप मोठा आणि व्यापक आहे. कष्टकऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेचे गाऱ्हाणे संसदेसमोर मांडण्यासाठी त्यांनी महाड ते दिल्ली अशी सायकल यात्रा काढली होती. झोपडपट्ट्या हटवल्या जाऊ नयेत, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचं नाव द्यावे, ‘एक गाव-एक पाणवठा’ बनावा, धरणग्रस्तांचे न्याय्य पुनर्वसन व्हावे यासारख्या विषयांबाबत त्यांनी संघर्ष केला होता. भेटणाऱ्या प्रत्येकाला ते सोनचाफ्याची ताजी फुले देऊन स्वागत करायचे. त्यांच्या चेहऱ्यावर तुकतुकीचा लवलेश नसायचा. केस पांढरे, मागे वळवलेले, बहुतेक वेळा विस्कटलेले असायचे. अंगात फिकट रंगाचा खादीचा झब्बा. बोलताना आवाज चढेल तसे त्यांचे हातवारे असायचे. संभाषण कधी समजावणीचे तर कधी वयाचा अधिकार दर्शवणारे. स्व.बाबा मोर्चात असोत की संघटनेच्या कार्यालयात; त्यांचं रुप असेच होते. मोर्चा असेल तर आधीच मार्ग ठरलेला असायचा. शिष्टमंडळात कोण-कोण असेल याची यादीही तयार असायची. मनात मुद्द्यांची जुळवाजुळव पक्की असते. मोर्चात सर्वांच्या पुढे ते तरातरा चालू लागायचे. हात उंचावून खड्या व धारदार आवाजात घोषणा द्यायचे. मोर्चा जरा सैलावल्यासारखा दिसला की स्व.डॉ.बाबा आढाव लगेच गाणे सुरु करायचे. त्यामुळे मोर्चेकऱ्यांमध्ये जोश निर्माण व्हायचा. संपूर्ण आयुष्यात संघर्षाच्या अनेक आघाड्यांवर सातत्याने कार्यरत राहून अनुभवसमृध्द जीवन जगलेले नेते अभावानेच सापडतात. स्व.डॉ.बाबा आढाव मात्र याला अपवाद ठरायचे. राष्ट्र सेवा दलाच्या बिनभिंतीच्या शाळेतून संस्कारित होऊन रचना, प्रबोधन व संघर्ष अशा सर्वच क्षेत्रांत लक्षवेधी काम करुन दाखवणारे अनेक कार्यकर्ते यांच्या अग्रभागी स्व.डॉ.बाबा आढाव यांचेच नाव आवर्जून अभिमानाने घेता येईल. स्व.डॉ.बाबा आढाव यांनी उभ्या केलेल्या अनेक संघटनांपैकी ‘हमाल पंचायत’, ‘कष्टाची भाकर’ यांसारखे प्रयोग अनेक अंगांनी वैशिष्टपूर्ण म्हणावे लागतील. कष्टकऱ्यांची भूक भागविण्यासाठी सुमारे ४७ वर्षांपासून कष्टाची भाकर हा प्रकल्प सुरु आहे. विशेष म्हणजे, विदेशी संस्थांची अथवा देशी कंपन्यांच्या ‘सीएसआर’ फंडाची आर्थिक मदत हा प्रकल्प घेत नाही. रेशनच्या धान्याव्यतिरिक्त सरकारचीही कुठलीच मदत नाही.

सामाजिक कृतज्ञता निधीच्या वतीने ‘हमाल पंचायत’, ‘कष्टाची भाकर’ला सामाजिक उद्योजकता पुरस्काराने गौरविण्यात आले. रिक्षा पंचायत, टेंपो पंचायत, अपंग कष्टकरी पंचायत, कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, हमाल मापाडी महामंडळ अशा अनेक संघटना उभ्या करताना समाजातल्या खऱ्या अर्थाने तळागाळातल्या जनसमूहाशी म्हणजेच ‘नाही रे’ वर्गाशी स्व.बाबांचे घट्ट नाते जोडले होते. एक ‘गाव-एक पाणवठा’, ‘मत मिळाले; पत कुठाय?’, ‘मनू पुतळा हटाव’ अशा सामाजिक समतेच्या विविध मोहिमा स्व.बाबांनी यशस्वीपणे राबवल्या. शोषित समाजाची वेदना दूर करण्याचे काम समाजाच्या दयाभावाच्या आधारे होऊ नये, तर ज्यांचा प्रश्न आहे त्या कष्टकऱ्यांचा स्वाभिमान जागवत, त्यांच्या संघटित दबावातूनच माणूस म्हणून जगण्याचा अधिकार त्यांना मिळाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा.

१९८० च्या दशकात महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक विषमतेच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या सर्व गटांना व नेत्यांना एकत्र आणणाऱ्या विषमता निर्मूलन परिषदेसारख्या मंचाचे समर्थ नेतृत्व स्व.बाबांनी केले. विषमता निर्मूलन शिबिरातला जोष आणि उत्साह पाहूनच आमच्यासारखे अनेक जण प्रभावित होऊन या चळवळीत ओढले गेले. दरम्यान, विषमता निर्मूलन शिबिरे हळूहळू थांबली. महाराष्ट्रात पूर्ण वेळ कार्यकर्त्यांची कमतरता नाही; पण बदलत्या जमान्यात, वाढत्या चंगळवादी जीवनशैलीच्या प्रभावात पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या अडचणी कोण समजून घेणार? बाबा आढाव, डॉ. नरेंद्र दाभोलकर, श्रीराम लागू, निळू फुले यांच्यासारख्या संवेदनशील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन, प्रचंड धडपड करून सामाजिक कृतज्ञता निधी स्थापन केला. स्व.बाबांनी महात्मा फुले समता प्रतिष्ठानमार्फत सत्यशोधक समाजाचा व सत्यशोधक नेत्यांच्या कार्याचा जो इतिहास समोर आणायचे काम केलेले आहे, ते फारच मूलभूत आहे. सत्यशोधक विचार हा केवळ निषेधाचा विचार नसून तो विवेकावर आधारित समतेची संस्कृती उभी करण्याचा पर्यायी आराखडा आहे. चळवळीच्या कार्यक्रमात छोट्या-मोठ्या कृतीद्वारे तो रुजविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न राहिला होता. प्रत्येक कार्यक्रमात ‘सत्य सर्वांचे आदी घर’ हा महात्मा फुले यांचा अखंड, प्रार्थना म्हणून सामुदायिकरित्या म्हणवून घेण्याचा आग्रह, कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराआधी वयाने ज्येष्ठ असलेल्या एका कष्टकरी स्त्रीचा व पुरुषाचा सत्कार आधी करणे, वर्षभरात साक्षर बनण्याचा निर्धार पाळलेल्या कष्टकरी पुरुषांच्या हातूनच पुढील वर्षी बाबासाहेबांच्या जयंतीदिनी बाबासाहेबांना हार घालणे यांसारखे प्रयोगशील उपक्रम राबविले. ‘म्हातारपणाचं करायचं काय? पेन्शन घेतल्याबिगर राहायचे नाय?’ असे म्हणत देशातल्या ९७ टक्के कामगारांच्या म्हणजेच जवळपास ५५ कोटी असंघटित कष्टकऱ्यांच्या जीवन-मरणाचे प्रश्न स्व.डॉ.बाबा आढाव यांनी व्यवस्थेसमोर आणले. त्यांच्या कल्पक नेतृत्वाबरोबरच समाजातल्या खऱ्या अर्थाने शोषित-पीडित समूहाबरोबरच राहण्याच्या त्यांच्या वृत्तीचे वैशिष्ट्य म्हणावा लागेल. दिवसभर कार्यकर्त्यांबरोबर काम करून घरी गेल्यावरही ते स्वस्थ बसत नव्हते.शीलाताईंना स्वयंपाकघरात मदत करायचे. ते थकत कसे नाहीत? कितीही वेळ काम कसे करु शकतात? लांबचा प्रवास करून गेल्यावरही गाडीतून उतरुन थेट व्यासपीठावर जात भाषण कसे करु शकतात? दूरगावचा प्रवास करुन आल्यावरही लगेच महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या साप्ताहिक बैठकीला न चुकता हजर कसे राहू शकतात? यांसारखे प्रश्न माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना पडायचे. आज बाबा आपल्यात नाहीत पण त्यांच्या शिकवणीची शिदोरी मात्र कायम सोबत असणार हे नक्की.

**शब्दांकन**
**प्रा.सुभाष वारे, पुणे**

## आगलावेवाडीत गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सांगोला,दि.९ डिसेंबर-**

आगलावेवाडी (ता. सांगोला) येथे ६५ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवार ९ डिसेंबर रोजी घडली. याबाबत माहिती अशी, साऊबा विठोबा माळी (वय-६५), रा.आगलावेवाडी ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी दि.९ डिसेंबर रोजी पहाटे पाच वाजण्यापूर्वी अनिल माळी यांचे शेतातील जांभळीच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. त्यांना उपचाराकरिता सरकारी दवाखाना, सांगोला येथे दाखल केले असता उपचारापुर्वीच ते मयत झाले. याबाबत अनिल साऊबा माळी, (रा.आगलावेवाडी) यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे खबर दिली तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १४५२६७४७८ | मालमत्ता तारण कर्ज | १. भाकरे अजित दत्तात्रय<br>२. सुनिता दत्तु भाकरे | ३०.०९.२०२५ | रुपये ७,७२,.३९२.१७/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ९८६, एकूण क्षेत्रफळ २१०० चौरस फूट, विभाग सोलापूर, उपविभाग माळशिरस, ग्रामपंचायत पिसेवाडी, सोलापूर, महाराष्ट्राच्या हद्दीत, आणि सदर मालमत्तेला अशा प्रकारे वेढले आहे: उत्तर: बळीराम मांडवे दक्षिण: कुमार भाकरे पूर्व: रस्ता पश्चिम: बापू भाकरे

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : १०/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)



## प्राथमिक शाळेचे तालुका क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण

**अक्कलकोट, दि. ९ डिसेंबर-**

फत्तेसिंह क्रीडांगण अक्कलकोट येथे घेण्यात आलेल्या प्राथमिक शाळेचे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, लकप्पा पुजारी, तुकाराम जाधव, परमेश्वर व्हसुरे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत अक्कलकोट,करजगी, मैंदर्गी व चपळगाव बीट सहभागी होते. या स्पर्धेत कबड्डी खो-खो लंगडी बुद्धिबळ धावणे या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कृष्णाकांत मोरे, देविदास वाघमोडे, शरद कुंभार, विशाल शेटे, नागराज कलबुर्गी, प्रकाश सोनटक्के, प्रेमदास राठोड, दत्तात्रय सावंत, रवीकिरण इंगळे, बाबू पवार, गणेश अंबुरे, गोविंद राठोड, अविनाश भैरुणगी, बसवराज सकरर्गी, दयानंद उटगे आदींनी परिश्रम घेतले.



## महर्षि प्रशालेत राज्यस्तरीय खेळाडूंचा गौरव

**अकलूज, दि. ९ डिसेंबर-**

महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर येथे विभागस्तर व राज्यस्तरीय नैपुण्य प्राप्त खेळाडू सत्कार समारंभ शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील व प्रशाला समिती सभापती ॲड.नितीनराव खराडे यांच्या हस्ते झाला.

सर्व प्रमुख मान्यवरांचे स्वागत महर्षि बाल वाद्यवृंदांच्या बालचमुंमार्फत स्वागत गीताने करण्यात आले. मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथी व सर्व गुणवंत खेळाडू यांच्याहस्ते सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. ४ बाय१००रिले,४ बाय ४००रिले, वेटलिफ्टिंग ,कुस्ती यांसारख्या क्रीडा प्रकारामध्ये विभाग स्तरावर अकरा खेळाडू व राज्यस्तरावर सहा खेळाडूंनी दैदीप्यमान यश संपादन केलेल्या खेळाडूंचा सत्कार झाला खेळाडूंच्या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील, संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी प्रशाला समिती सदस्य अनिल जाधव, विनोद जाधव, नितीन इंगवले देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाझिया मुल्ला यांनी केले बिभीषण जाधव यांनी आभार मानले.

**सत्कारमूर्ती खेळाडू :** जानवी खांडवे, वैभवी ठोंबरे, अवनी नवगिरे, निशा साठे. रुद्रराज जाधव (इन्स्पायर अवॉर्ड मध्ये निवडलेला) सार्थक राऊत (बुद्धिबळ आंतरराष्ट्रीय मानांकन) , प्राध्यापक धनंजय देशमुख (शिक्षक योगासन स्पर्धेत प्रथम) अनिल मोहिते, प्रदीप पांढरे ,दादाभाई सय्यद, उमेश बोरावके, अभिजीत बावळे (मार्गदर्शक शिक्षक)

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता - इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स सोलापूर ४१३००१
नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग, सो.म.पा
ईमेल- smcroadsection@gmail.com मो.नं.९४२३९९२७४८

जा.क्र. नगरअभियंता/रस्ते विभाग/२०२५-२६/१८४४ दि. ०८/१२/२०२५

**ई- निविदा सूचना क्र. /२०२५-२६**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर अभियंता कार्यालय रस्ते विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रात, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना २५-२६ अंतर्गत खालील कामाचे ई- निविदा बाबत.

१) टेंडर आय डी-2025_SMC_1256866_1

वरील कामाचे निविदा :http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०८/१२/२०२५ ते दि.१५/१२/२०२५ पर्यंत भरणेस उपलब्ध आहे.

सही/-
प्र. नगर अभियंता
सोलापुर महानगपालिका, सोलापूर

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १३४२८४०८० | मालमत्ता तारण कर्ज | १. अमोल सुरेश जाधव<br>२. आश्विनी अमोज जाधव | ०९.०४.२०२५ | रुपये ८,४६,४९३.९३/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिल्कट क्रमांक ७८३, एकूण १२२५ चौ. फूट, ग्रामपंचायतीच्या मर्यादेत स्थित: परिते, उप-विभाग: माढा, दिव: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२११, आणि सीमा:- पूर्व: बाळू वाघ पश्चिम: बाळासाहेब जाधव उत्तर: गट क्रमांक ८४४ दक्षिण: रस्ता

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | १००५२८५०४ | मालमत्ता तारण कर्ज | १. समाधान केरबा सलगर<br>२. रमजान केरु सलगर | २१.१२.२०२५ | रुपये ५,१०,६४८.८७/- |

**मालमत्तेचा पत्ता:** २६.६*४३ म्हणजेच ११४३.८ चौ.फूट लांबीचे आरसीसी घर बांधणी क्षेत्र आणि २३४.२ चौ. फूट लांबीचे खुले क्षेत्र, ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ७२७ वर बांधलेले, बेंबळे गाव येथे स्थित, उपनिबंधक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात, ता. माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२११, आणि अशी सीमा आहे: - पूर्व: सामान्य बोगदा पश्चिम: रस्ता उत्तर: अनुरथ सलगर मिळकत दक्षिण: रस्ता

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : १०/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)



# शहिदांच्या कुटुंबियांसाठी ध्वजदिन निधीचा वापर : कर्नल रणधीर सतीश

## सोलापूर जिल्ह्याला १ कोटी ७२ लाखांचे निधी संकलन उद्दिष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.९ डिसेंबर-**

देश रक्षणासाठी शहीद झालेल्या कुटुंबियांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी ध्वजदिन निधीचा वापर केला जातो. शासनाने मागील वर्षी सशस्त्र सेना ध्वजनिधीसाठी १ कोटी ७२ लाख उद्दिष्ट दिले होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली १२६ टक्के म्हणजे २ कोटी १७ लाख १५ हजार ४७० रुपये निधी संकलन करण्यात आले. यंदाच्या वर्षी सोलापूर जिल्ह्याला १ कोटी ७२ लाख इतके उद्दिष्ट देण्यात आले आहे, असे प्रतिपादन एनसीसीच्या महाराष्ट्र बटालियन ९ चे कमान अधिकारी कर्नल रणधीर सतीश यांनी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ले. कर्नल शरब बाचर, मेजर मिलिंद देवदत्त तुंगार, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, पोलीस निरीक्षक, वैष्णवी पाटील, दिलीप तडाखे, विधिज्ज्ञ लक्ष्मण पाटील, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलनामध्ये पश्चिम महाराष्ट्र विभागातून सोलापूर जिल्ह्याने सर्वात जास्त निधी संकलन करुन अव्वल स्थान प्राप्त केले आहे. त्याअनुषंगाने १० डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, निवृत्त मेजर मिलिंद देवदत्त तुंगार यांचा राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे हस्ते गौरव करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले. अंजली खानापूरे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी संजीव पवार यांनी आभार मानले.

# महापालिकेच्या फेरआरक्षणाला उच्च न्यायालयात आव्हान याचिका

## पूर्वीचे आरक्षण कायम ठेवा : डॉ. बगले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

महानगरपालिकेतील राखीव जागांच्या आरक्षणात छेडछाड करून शासन अध्यादेशाचा आणि निवडणूक नियमांचा भंग केल्याने पहिल्या सोडतीद्वारे निश्चित झालेले आरक्षण कायम ठेवण्यात यावे. १७ नोव्हेंबर रोजी काढलेले फेरआरक्षण आणि २ डिसेंबर रोजीचा अंतिम आरक्षणाचा अध्यादेश बेकायदेशीर व नियमबाह्य असल्यामुळे तो रद्दबातल करावा. या मागणीसाठी राष्ट्रवादीचे नेते डॉ.बसवराज बगले यांनी उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिकेद्वारे आव्हान दिले आहे.

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने राखीव जागांचे आरक्षण सोडत काढण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्तांना दिले होते. त्यानुसार ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सोडत काढून १०२ जागांचे आरक्षण निश्चित केले.ते नियमानुसार योग्यच असल्याने त्या आरक्षणाला कोणीही आक्षेप घेतला नाही. आणि अपील दाखल करून तक्रारही केली नाही. त्यानुसार अंतिम अध्यादेश काढणे अपेक्षित होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने १४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या एका पत्राद्वारे सोलापूर






महानगरपालिकेतील एकूण २६ पैकी फक्त भारती विद्यापीठ भागातील २४ या एकाच प्रभागात ओबीसी महिला या जागेचे थेट फेरआरक्षण काढण्यात यावे, असे चुकीचे आदेश दिले.

त्यानुसार महापालिका आयुक्तांनी १७ नोव्हेंबर रोजी फेर आरक्षणाची सोडत काढून प्रभाग २४ मधील ओबीसी सर्वसाधारण जागेवर थेट ओबीसी महिला आरक्षण लादले. याच प्रभागात अनुसूचित जमाती महिलेचे थेट आरक्षण ठेवलेले असताना पुन्हा ओबीसी सर्वसाधारण जागेवर नियमबाह्यपणे थेट महिला आरक्षण लादण्यात आले.

या नियमबाह्य कार्यवाहीमुळे संपूर्ण प्रभागाच्या आरक्षणात विसंगती निर्माण झाली असून ओबीसी जागांची संख्या सुध्दा घटली आहे. महापालिका निवडणूक नियमातील तरतुदी डावलून राखीव जागांच्या आरक्षणात राजकीय दबावाखाली छेडछाड केली आणि ओबीसी सर्वसाधारण जागेचे आरक्षण बदलले. प्रभाग क्रमांक २४ मधील सर्वसाधारण महिला या जागेच्या आरक्षणात बदल होवून ती जागा सर्वसाधारण झाली. त्यामुळे महिलांच्या हक्कावर गदा आली आणि अन्याय झाला आहे, असे याचिकेत नमूद केले आहे.

निवडणूक आयोगाच्या हस्तक्षेपामुळे राखीव जागांचे आरक्षण बदलले गेले. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी डॉ.बगले यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे अपील दाखल केले होते. मात्र त्या अपिलाची दखल न घेता, सुनावणीची संधी न देता हुकुमशाही पध्दतीने काढलेले चुकीचे फेरआरक्षण ग्राह्य धरून आरक्षण अंतिम केल्याचा अध्यादेश शासनाने प्रसिध्द केला आहे, त्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

**कोल्हापुरातून मुंबई उच्च न्यायालयात याचिका वर्ग**

उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात मंगळवारी आव्हान याचिका दाखल करुन डॉ.बसवराज बगले यांनी मुख्य न्यायाधीश मकरंद कर्णिक आणि न्यायाधीश अजित यांच्या द्विसदस्यीय खंडपीठासमोर तात्काळ सुनावणी घेण्याची विनंती केली. आव्हान याचिकेतील विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन ही याचिका तात्काळ मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आल्याचे सांगण्यात आले.





सोलापूर : मंगळवारी सायंकाळी मांगल्य मंगल कार्यालयात सकल ब्राह्मण महिला मेळावा जुळे सोलापूर व कौस्तुभ ब्राह्मण वधू वर सूचक केंद्र यांच्या वतीने आयोजित ह.भ.प श्रीकांत महाराज आरोळे यांचे 'विवाह समस्या काल आज आणि उद्या' या विषयावर व्याख्यान झाले

# वाळू माफियांची दहशत; वकिलावर रॉडने हल्ला

## १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ९ डिसेंबर-**

माढा तालुक्यात वाळू माफियांची जणू दहशत सुरु असून अवैध वाळू उपसाची माहिती दिल्याच्या संशयावरुन एका तरुण वकिलावर दगड, लोखंडी रॉड, दांडक्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना टेंभुर्णी येथे घडली. यात गंभीर जखमी झालेल्या वकिलावर पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

ॲड.पांडुरंग कुबेर तोडकर (वय-३२, रा.अकोले खुर्द) असे यातील जखमी वकिलांचे नाव आहे. याप्रकरणी १२ ते १३ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

दि.३ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेतात पाणी देताना मागून कोणीतरी पाठलाग केल्याचा संशय आला. मित्र लखन कुटे यांनी विक्रम पराडे याला फोन करण्याची सूचना केली. टेंभुर्णीतील योगीराज पेट्रोल पंप जवळील त्रिमूर्ती हॉटेल या ठिकाणी गेल्यावर, विक्रम पराडे आणि त्याचे सहकारी यांनी 'तू आमच्या अवैध वाळू उपसाबाबत पोलिसांना माहिती दिलंस का?' असे म्हणत दगड, लोखंडी रॉड, दांडके आणि अँगलसारखी घातक शस्त्रांने प्राणघातक



हल्ला केला. या अमानुष मारहाणीमध्ये तोडकर यांना शरीराच्या विविध भागांवर गंभीर जखमा, उजव्या पायाच्या नडगीला फ्रॅक्चर, तसेच डाव्या हाताच्या करंगळीशेजारी दोन बोटांची फ्रॅक्चर झाली. हल्ला करणारे आरोपी काळ्या रंगाच्या थार व स्कॉर्पिओ या वाहनांतून आले होते.

दोन्ही वाहनांना नंबर प्लेट नव्हती. याबाबत पुणे येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन तो गुन्हा दि.८ डिसेंबर रोजी टेंभुर्णी पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी हे पुढील तपास करीत आहेत.

# शहरातील ३१४ सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्तीला वेग

## नागरिकांनी निकृष्ट कामाची तत्काळ तक्रार करावी : आयुक्त डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

महानगरपालिकेकडून शहरातील दैनंदिन साफसफाई, झाडलोट, कचरा संकलन यासोबतच सर्व ३१४ सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता नियमितपणे केली जाते. यापैकी अनेक शौचालयांत दुरुस्ती आणि सुविधांची उणीव असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी व अधिकाऱ्यांच्या पाहणीनुसार महापालिकेने मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती कामे हाती घेतली आहेत.नागरिकांनी निकृष्ट कामाची तत्काळ तक्रार करावी , असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

महानगरपालिकेच्या आठ विभागीय कार्यालयांतील आरोग्य निरीक्षकांमार्फत सर्व शौचालयांचे सर्व्हेक्षण करून आवश्यक दुरुस्ती व सुविधा याची माहिती संकलित करण्यात आली. त्यानुसार तयार झालेल्या पूर्वगणनपत्रकावरून पहिल्या टप्प्यात ३८ ठिकाणी तर दुसऱ्या टप्प्यात ९३ ठिकाणी विविध प्रकारची दुरुस्तीची कामे सुरू आहेत. ही कामे विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या मंजूर मक्तेदारांकडून करण्यात येत असून त्यांच्या माध्यमातून आवश्यक ती दुरुस्ती आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्तीचे काम सुरु असलेल्या सर्व ठिकाणी नागरिकांनीही लक्ष ठेवून कामाची गुणवत्ता तपासावी, असे आवाहन आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी केले आहे.कोठेही निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे दिसल्यास नागरिकांनी संबंधित आरोग्य निरीक्षक किंवा विभागीय अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, अशी स्पष्ट सूचना बैठकीत देण्यात आली.तसेच आठवड्यातून एकदा सर्व संबंधितांची बैठक घेऊन कामाचा आढावा घेण्याचे आणि कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांना दिले आहेत.

महापालिकेमार्फत सर्व कामांसाठी १० कोटी इतका निधी खर्च : ही सर्व कामे वेळेत, उत्तम गुणवत्तेने पूर्ण व्हावीत, तसेच ड्रेनेज लाईन टाकताना आवश्यक जाडीच्या पाईपचा वापर करावा जेणेकरून वारंवार अडथळे निर्माण होणार नाहीत, अशा सक्त सूचना आयुक्तांनी मक्तेदारांना दिल्या.या सर्व कामांसाठी १० कोटी इतका निधी महापालिकेमार्फत खर्च करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सांगितले. ११७ शौचालयांमध्ये नव्याने बोअर, मोटर आणि हातपंप : दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या समवेत विभागीय अधिकारी, अभियंते, मुख्य सफाई अधिक्षक, मुख्य आरोग्य निरीक्षक आणि मक्तेदारांची बैठक घेऊन कामकाजाची सद्यस्थिती तपासली. शहरातील अनेक शौचालयांत पाण्याची कमतरता असल्यामुळे एकूण ११७ ठिकाणी नव्याने बोअर घेणे, इलेक्ट्रिक मोटर बसविणे व हातपंप बसविण्याची कामे सुरू असल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली.



# भाजपाच्या यशात व्यापारी वर्गाचा मोठा वाटा : तडवळकर

## भाजपा व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी अनुपम खंडेलवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

व्यापारी गेल्या अनेक दशकांपासून भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. भारतीय जनता पार्टीच्या यशात व्यापारी वर्गाचा मोठा वाटा आहे, असे प्रतिपादन भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केले. भाजपा भाजपा व्यापारी आघाडीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप पक्ष कार्यालयात करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर भाजपाच्या सरचिटणीस सुधा अळीमोरे, उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा, व्यापारी आघाडीचे शहर अध्यक्ष अनुपम खंडेलवाल,महिला आघाडीच्या शहर अध्यक्षा रंजिता चाकोते, लक्ष्मण गायकवाड, सुतार उपस्थित होते.

शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर म्हणाल्या, व्यापारी आणि ग्राहकांचे विश्वासाचे नाते असते. व्यापारी वर्गाचा भारतीय जनता पार्टीवर प्रगाढ विश्वास असल्यामुळे हजारो व्यापाऱ्यांनी नागरिकांना भाजपाशी जोडले आहे. भारतीय जनता पार्टी व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटीबद्ध आहे. आगामी महापालिका निवडणुकीत भाजपाचे नगरसेवक महापालिकेत पाठवण्यासाठी व्यापारी वर्गाने सज्ज व्हावे, असे आवाहनही भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी केले. भाजपाचे शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा यांनी प्रास्ताविक तर व्यापारी आघाडीचे उपाध्यक्ष शिवानंद सावळगी यांनी आभार प्रदर्शन केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा तसेच व्यापारी आघाडीचे शहर अध्यक्ष अनुपम खंडेलवाल यांनी अभिनंदन केले.

**भाजपा व्यापारी आघाडीचे नवनियुक्त पदाधिकारी याप्रमाणे :**
अध्यक्ष - अनुपम खंडेलवाल, उपाध्यक्ष - शिवानंद सावळगी, लक्ष्मीकांत खंडेलवाल, अनुप वेर्णेकर, लक्ष्मण भाईकट्टी, आनंद खंडेलवाल, गौरीशंकर वर्मा, सचिव - लक्ष्मीकांत दरक, सहसचिव - धीरज रमणशेट्टी, सोमनाथ गोयल, पवन शर्मा, संघटन सचिव - अमोलसिंग पवार, रुपेश उपाध्याय, जगदीश बोडा, चंपाराम देवासी, कोषाध्यक्ष - लक्ष्मीकांत तापडिया, सहकोषाध्यक्ष - विशाल वर्मा, मीडिया प्रमुख - गोपाल झंवर, सहमीडिया प्रमुख - प्रदीप जोशी, कायदेशीर सल्लागार - ॲड. शांतिवीर महिंद्रकर, सल्लागार - पवन अग्रवाल, अशोक वर्मा, सुनील नागणकेरी, घनश्याम दायमा, जयंत दरबी, कार्यकारणी सदस्य - कृष्ण होमकर, गोवर्धन डिडवाणी, अमोल शहाणे.

# जिल्ह्यातील फक्त १६ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी पेंडिंग

## ६८३ कोटी ३० लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा

**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे करण्यात आली. सर्वच रक्कम मंजूर झाली आहे. यातील ६ लाख १५ हजार ८६२ शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७४८ कोटी ४० लाख ९१ हजार ९७२ रूपये मंजूर झाले आहे.

यापैकी ५ लाख ६७ हजार २७२ शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ६८३ कोटी ३० लाख ८२ हजार ७० रूपये झाले जमा झाले आहेत. ईकेवायसीअभावी १६ हजार ०१५ शेतकऱ्यांचे १७ कोटी ८९ लाख ७२ हजार ६९१ रूपये पेंडिंग पडले आहेत. अजून १६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर दमडीही पडली नसल्याने त्यांना रब्बी हंगामाचे बि-बियाणे, खते घेता आली नसल्याची त्यांची खंत आहे. ही रक्कम अदा करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. ई-केवायसी नसली तरी आता फार्मर आयडी शेतकऱ्यांसाठी गरजेचा आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत.

महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांनाही पैसे मंजूर झाले असून, येत्या काही दिवसात पैसे मिळणार आहेत. गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. महापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केली होती; तीही मंजूर झाली आहे. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहीरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरीच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# बळीराजाची यंदा 'रब्बी'वरच 'मदार' आतापर्यंत ८२ टक्के पेरणी

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ०९ डिसेंबर-**

अतिवृष्टी, पूर व उशिरापर्यंत पाऊस पडल्याने जिल्ह्यात ज्वारीचा पेरा सरासरीपेक्षा ५० ते ६० हजार हेक्टरने घटण्याची शक्यता असून, या क्षेत्रावर मका, कांदा, हरभरा अन् फळबागा-उसाचा टक्का वाढला आहे. एकंदरीत, सध्यातरी रब्बी हंगामातील पेरणी जोमात सुरु असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यात आजतागायत रब्बी हंगामात साडेतीन लाख हेक्टरच्यावर (८२.०७ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली असून, या पंधरवड्यात रब्बी पेरणी १०० टक्के पूर्ण होण्याची शक्यता कृषी विभागाकडून वर्तविण्यात येत आहे. एकंदरीत, यंदा बळीराजाला रब्बी हंगामच तारणार असल्याचे दिसून येत आहे.

जूनमध्ये पेरणी केलेल्या खरिपाच्या बहारदार आलेल्या पिकांना, फळबागांना आणि ऊस पिकाला सप्टेंबरमध्ये महापूर आणि अतिवृष्टीचा मोठा फटका बसला होता. या अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील तब्बल ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान होवून कोट्यवधींची हानी झाली आहे. शासनस्तरावरुन नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटीपर्यंत मदत मंजूर झाली असून, तिचे वाटप ऑनलाईनने सुरू आहे. तशीतर ही मदत शेतकऱ्यांसाठी तोकडीच आहे. कितीतरी पटीने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यामुळे यंदा खरिपाच्या हंगामात बळीराजाला कोणतेही उत्पन्न साधले नाही. आता बहुतांश शेतकऱ्यांनी आता रब्बी हंगामाकडे लक्ष दिले असून, ज्वारी, गहू, हरभरा, कांदा, मका आणि ऊस-फळबागा वाढविण्यास आरंभ केला आहे. भविष्यात या उत्पन्नातूनच त्यांचे नुकसान थोडे-थोडे करून भरून निघणार आहे. यंदा मे महिन्यापासून पडलेल्या पावसामुळे खरीप पेरणी सरासरीपेक्षा अधिक क्षेत्रावर झाली; मात्र नंतर सतत पाऊस पडत राहिल्याने जमिनीतील ओल काही हटली नाही. त्यातच अतिवृष्टी आणि महापुराचा दणका बसल्याने हातातोंडाशी आलेला शेतकऱ्यांचा घास हिरावला गेला. उशिरापर्यंत जोरदार पाऊस पडत राहिल्याने रब्बी पेरणीही त्यांना लवकर करता आली नाही. जमिनीचा वापसा उशिरा झाल्याने ज्वारी पेरणी क्षेत्र कमी झाल्याची खंत काही शेतकरी बांधव व्यक्त करीत आहेत. ज्वारी क्षेत्र जरी कमी झाले तरी मका, कांदा, गहू, हरभरा क्षेत्र वाढत आहे. जिल्ह्याचे रब्बी पेरणीचे सरासरी क्षेत्र ४ लाख ४३ हजार हेक्टर असून, प्रत्यक्षात पेरणी ३ लाख ६० हजार हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. सरासरी क्षेत्राच्या ८२ टक्के इतकी पेरणी झाली असली तरी जानेवारीपर्यंत पेरणी सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात येते.

म्हणजेच यंदा ही उशिराने केलेली पिके मार्च-एप्रिल एन्डलाच निघणार आहेत. अजूनही पेरण्या चालूच असल्याने मे महिन्यातही काही पिकांच्या राशी होण्याचे संकेत मिळत आहेत. एकंदरीत, यंदा मुबलक पाऊस झाल्याने मुबलक पाणीसाठा झाला आहे. यामुळे अनेक शेतकरी भाजीपाला-फळभाज्या, फुलांची लागवड करूनही मोठ्या प्रमाणात पैसा कमवू लागले आहेत. रब्बीतही पेरणी केलेली पिके सध्या चांगलीच बहरली असून, यंदा रब्बी हंगाम बळीराजाला साधेल, अशी अपेक्षा सर्वांनाच वाटू लागली आहे.



### माळशिरस, मंगळवेढा, बार्शीची पेरणीत आघाडी

तालुकानिहाय पेरणी पाहिली तर उत्तर सोलापूर ८६.५ टक्के पेरणी झाली आहे. दक्षिण सोलापूर ८७.८५, बार्शी ९१, अक्कलकोट ७८.४५, मोहोळ ८०.५३, माढा ५८.४५, करमाळा ८२.३८, पंढरपूर ७१.५९, सांगोला ७८.८९, माळशिरस ९८.०६ आणि मंगळवेढा तालुक्यात ९०.४१ टक्के पेरणी झाली असून, जिल्ह्यात सरासरी ८२.०७ इतकी पेरणी झाली आहे. तर माळशिरस, मंगळवेढा, बार्शीची पेरणीत आघाडी दिसून येत आहे.


**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आठवडी बाजारात महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

आठवडी बाजारात खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादीनुसार, स्वाती पृथ्वीराज सस्ते (वय ४८, रा. पद्मिनी निवास, रामनगर, धाराशिव) या दि.७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारास १.३० वाजता आठवडी बाजारात भाजीपाला खरेदी करत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील २ लाख ६८ हजार ५३४ रूपये किंमतीचे सोन्याचे गंठन चोरून नेले.

या प्रकरणी स्वाती सस्ते (वय ४८, धाराशिव) यांनी दि.८ डिसेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून याबाबत पुढील तपास सुरू आहे.



### ›› संक्षिप्त वृत्त...



### वरूण धर्मच्या पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन प्रकल्पाला प्रथम क्रमांक

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी वरूण धर्म याने सादर केलेल्या पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन प्रकल्पाला धाराशिव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ मध्ये माध्यमिक गटात प्रथम क्रमांक मिळाला आहे. वरूण धर्मने 'स्मार्ट कंपोस्ट डस्टबिन' तयार केले असून यात घरगुती ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे विभाजित करून अत्यल्प वेळेत कंपोस्टमध्ये रूपांतरित करण्याची व्यवस्था आहे. पर्यावरणस्नेही आणि टाकाऊ कचऱ्याचे उपयोजित व्यवस्थापन करणारा हा प्रकल्प परीक्षकांच्या विशेष पसंतीस उतरला. या यशाबद्दल मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांनी वरूणचे अभिनंदन केले असून विज्ञान शिक्षिका शिंदे यांनी त्याला मार्गदर्शन केले.



### प्रेप शिक्षकांचा मोबाईल व्यसनावर फ्लॅश मॉब, सामाजिक संदेशाला प्रतिसाद

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

प्रेप, धाराशिवच्या शिक्षकांनी पद्माक्षी सोसायटीमध्ये एक प्रभावी आणि सामाजिक जाणीव जागवणारा फ्लॅश मॉब ड्रामा सादर करून नागरिकांचे लक्ष वेधले. या नाट्य प्रयोगाचा उद्देश मोबाईलच्या अतिरेकाचे दुष्परिणाम दाखवणे आणि कुटुंबातील नात्यांचे खरे महत्त्व अधोरेखित करणे हा होता. ड्रामामध्ये दाखवण्यात आले की मोबाईलमध्ये गुंग झाल्यामुळे आपण आपल्या कुटुंबापासून, दैनंदिन वास्तवापासून आणि सामाजिक आयुष्यापासून हळूहळू दूर जातो. शिक्षकांनी प्रभावी अभिनयातून संदेश दिला की मोबाईलवर अनावश्यक वेळ घालवण्यापेक्षा वर्तमानपत्र वाचणे, कुटुंबीयांशी संवाद साधणे आणि एकत्र वेळ घालवणे अधिक महत्त्वाचे आहे. या फ्लॅश मॉबने सोसायटीतील नागरिकांना गंभीरपणे विचार करण्यास प्रवृत्त केले. उपस्थितांनी शिक्षकांच्या सामाजिक संदेशाचे कौतुक करत उत्स्फूर्त टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला.

### सामाजिक चळवळीचा बाबा आढाव यांना राष्ट्रवादीकडून (शरद पवार गट) श्रद्धांजली

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

महाराष्ट्रातील असंघटित कामगारांचे प्रेरणास्थान आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचे



पुण्यातील रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. हमाल, रिक्षाचालक यांसह असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. हमाल पंचायत, रिक्षाचालक संघटना उभारणे व एक गाव एक पाणवठा चळवळीचे नेतृत्व हे त्यांचे महत्वाचे योगदान मानले जाते. कामगारांचे पेन्शन, सामाजिक न्याय, समानता या मुद्द्यांवर त्यांनी राज्य-राष्ट्रीय पातळीवर प्रभावी आवाज उठवला. त्यांच्या जाण्याने कामगार चळवळीला मोठी पोकळी निर्माण झाली आहे. धाराशिव राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी बाबा आढाव हे केवळ व्यक्ती नव्हते, तर सामाजिक न्यायाची एक संपूर्ण चळवळ होते अशा शब्दांत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.



### संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

धाराशिव येथे संत जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी यावेळी संताजी जगनाडे महाराज यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, विश्वास शिंदे, संजय देशमुख, धनंजय शिंगाडे, रवि कोरे आळणीकर, सोमनाथ गुरव, अभिजित काकडे, तुषार निंबाळकर, लक्ष्मण माने, दाजीअप्पा पवार, ॲड. विशाल साखरे, ॲड. मंजुषा साखरे, ॲड. खंडेराव चौरे, आबासाहेब खोत, गवळी, पंकज पाटील, वैजिनाथ गुळवे, प्रमोद मेंगले, लक्ष्मण निर्मळे, शिवलिंग होनखांबे, चंद्रकांत निर्मळे,पांडूरंग भोसले, विशाल मिश्रा, प्रशांत माळी, विष्णु इंगळे, राम माने यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

### वाहतूक पोलिसांची नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा-नियमभंग प्रकरणी कारवाई केली. दि. ८ डिसेंबर रोजी या कारवाईत एकूण २८७ प्रकरणे नोंदवली असून, त्यातून २,२८,५५० रु. तडजोड शुल्क वसूल केले.

# साई कला केंद्रातील महिलेसोबत प्रेमसंबंधाच्या वादातून तरुणाची आत्महत्या

### ›› धाराशिव जिल्ह्यातील कला केंद्र पुन्हा एकदा चर्चेत...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी परिसरात प्रेमसंबंधातील वादातून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणाने परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत माहिती अशी की, अश्रुबा अंकुश कांबळे (वय ३९, रा. रुई-ढोकी) असे मृत तरुणाचे नाव आहे. प्रारंभी मिळालेल्या माहितीनुसार, मृतक अंकुश कांबळे यांचे एका महिलेबरोबर काही काळापासून मैत्रीपूर्ण संबंध होते. संबंधित महिला पूर्वी धाराशिव येथील एका कला केंद्रात नृत्य कलाकार म्हणून कार्यरत होती, तर सध्या ती बार्शी तालुक्यातील शेंदरी येथील एका कला केंद्रात कार्यरत असल्याचे समजते.

दोघेही काल शिखर शिंगणापूर येथे देवदर्शनासाठी गेले होते. परतीच्या प्रवासात दोघांमध्ये वाद झाल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, मृतकाच्या पत्नीचा आलेला फोन हा वाद अधिक वाढण्यास कारणीभूत ठरल्याची प्राथमिक माहिती आहे.



मयत - अंकुश कांबळे

संतापाच्या भरात मृतकाने आत्महत्या करीन अशी धमकी दिल्याचेही सांगितले जात आहे.

रात्री उशिरा चोराखळी परिसरात तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच येरमाळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा व पोस्टमार्टम करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. संबंधित महिलेची पोलिसांकडून चौकशी करण्यात येत आहे.

दरम्यान, काही कला केंद्रामध्ये अलीकडच्या काळात वाद, गैरप्रकार व सामाजिक वाद-विवाद निर्माण झाल्याच्या चर्चा होत असताना, या नव्या घटनेमुळे कला केंद्र पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.




मात्र, या घटनेचे नेमके कारण व जबाबदाऱ्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

## मंदिर महाद्वारात भाविक-फेरीवाल्यांत हाणामारी; सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ डिसेंबर -**

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मंदिर महाद्वारासमोर किरकोळ कड्यांवरून किरकोळ विक्रेते, फेरीवाले, दोऱ्या विकणारे काटीवाले आणि बांगड्या विकणाऱ्या महिलांनी मारहाण केल्याची घटना ८ डिसेंबर रोजी सायंकाळी आठच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे पुन्हा एकदा भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

इचलकरंजी येथील हर्षद रमेश गडदे, सारिका बसप्पा तोडगी, तसेच बेळगाव येथील सुरेखा रमेश गडदे यांच्यासह दहा-बारा भाविकांचा घोळका दर्शनासाठी आला होता. मंदिर महाद्वारासमोर किरकोळ कारणावरून त्यांचा फेरीवाल्यांशी वाद झाला आणि त्यानंतर हाणामारी झाली. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी अनोष अनिल धावारे (रा. तुळजापूर) यांच्या उपस्थितीत मंदिर पोलीस चौकीत परस्परांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली.

घटनेनंतर मंदिर पोलीस चौकीसमोर तब्बल पाऊण तास गोंधळ निर्माण झाला. वाढत्या तणावामुळे परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच मंदिर पोलीस कर्मचारी आकाश सुरनर यांनी पोलीस वाहन मागवून भाविकांसह दोऱ्या विक्रेते आणि बांगड्या विकणाऱ्या महिलांना तुळजापूर पोलीस चौकीकडे हलवले.

## वाशी तालुक्यात शरद पवार गटाची निवडणूक तयारी जोरात



›› जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील यांचा धडाकेबाज दौरा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.९ डिसेंबर -**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर वाशी तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. शरद पवार गटाचे नव्याने नियुक्त जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील यांनी (दि.९) तालुक्यातील सर्व जि.प. व पं.स. गटांत दौरा करत गावभेटींची मालिका राबवली.

दौऱ्याची सुरुवात तेरखेडा येथील युवक व पदाधिकारी बैठकीने झाली. यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून कार्यकर्त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच आगामी निवडणुकीसाठी बूथस्तरीय नियोजन, मतदारांपर्यंत पोहोचण्याची रणनीती याबाबत मार्गदर्शन केले. या दौऱ्यानंतर वाशी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची शक्यता अधिक दृढ झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. त्यामुळे तालुक्यातील राजकारणात नव्या चुरशीची चिन्हे दिसू लागली आहेत.

बैठकीस दिलीप घोलप, सुदाम पाटील, विश्वास सरवदे, बबलू कुदळे, दत्ता कुदळे, अंकित उकरंडे, कार्यकर्ते उपस्थित होते.

## व्यंकटेश महाजन महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण व पर्यावरण विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) आणि पर्यावरण या विषयांवर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत पार पडली.

पर्यावरण या विषयावर पुणे विद्यापीठाचे प्रा.डॉ. रवींद्र जयभये आणि प्रा.डॉ. प्रवीण कोकणे यांनी पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व, नागरिकांची भूमिका आणि सामाजिक जबाबदाऱ्या याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

वीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत प्रा.डॉ. बिना मेनन, प्रा. सुरजकुमार बाबर, डॉ. मिथिलेश भाकरे आणि डॉ. अंजुषा दाभणे यांनी सविस्तर माहिती मांडली. एनईपीमुळे शिक्षणव्यवस्थेत होणारे सकारात्मक बदल, विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाची संकल्पना आणि भविष्यातील संधी यांवरही चर्चा झाली. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी संस्था प्रतिनिधी कमलाकर पाटील, शेषाद्री डांगे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. अभय शिंदे, प्रा.डॉ. विनोदकुमार वायचळ, प्रा.डॉ. मिलिंद माने आणि प्रा. अमोल हिंगमिरे यांनी संयोजितपणे केले. या कार्यशाळेस प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## साउंडच्या दुकानातून महिलेचा मोबाइल फोन चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

शहरातील देशपांडे स्टँड परिसरात मोबाईल चोरीची घटना घडली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी सुवर्णा



महेश सानप (वय ३७ वर्षे, रा. देशपांडे स्टँड मागे, धाराशिव) यांचा २० हजार ९९९ रूपये किंमतीचा तर्ळो मोबाईल फोन हा दि.२५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता देशपांडे स्टँड येथील इरफान शेख यांच्या साउंड दुकानातून अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.

या प्रकरणी सुवर्णा सानप यांनी दि.८ डिसेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## नांदुरी परिसरातून तीन म्हशींची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

नांदुरी (ता. तुळजापूर) येथे शेतात बांधलेल्या तीन म्हशी अज्ञात व्यक्तींनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.



**तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी हणमंत हरिहर पाटील (वय ४६, रा. नांदुरी) यांच्या तसेच पंडित केशव कोळी आणि तानाजी गोपीनाथ गोंगाणे यांच्या शेतात बांधलेल्या म्हशी अंदाजे ९० हजार रूपये इतक्या किमतीच्या असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी हणमंत पाटील यांनी दि.८ डिसेंबर रोजी तामलवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## नळदुर्ग महामार्ग अंधारातच! पथदिवे बंद असल्याने नागरिक त्रस्त

### खंडोबा यात्रेपुर्वी दिवे सुरु करा, अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ डिसेंबर -**

राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापुर यांच्या गलथान कारभारामुळे नळदुर्ग शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकामध्ये बसविण्यात आलेले पथदिवे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद पडले आहेत. नागरिकांकडून वारंवार मागणी होऊनही हे दिवे अद्याप सुरु न झाल्याने गोलाई चौक ते बसस्थानकापर्यंतचा संपूर्ण भाग रात्री अंधारमय बनला आहे. या गंभीर परिस्थितीबाबत तात्काळ उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेवक सुधीर हजारे यांनी दिला आहे.



नळदुर्ग - अक्कलकोट रस्त्याच्या कामांतर्गत गोलाई चौक ते बसस्थानक मार्गावर महामार्गाच्या दुभाजकामध्ये ५२ पोल उभारण्यात आले असून प्रत्येक पोलवर दोन पथदिवे बसविण्यात आले आहेत. सुरुवातीचे काही महिने हे दिवे व्यवस्थित चालले, मात्र नंतर ते वारंवार बंद पडू लागले.

सध्या तर एकाही पोलवरील एकही दिवा सुरु नसल्याने हा संपूर्ण महामार्ग रात्रीच्या वेळी अतिशय धोकादायक झाला आहे. बायपासमार्गे वाहतूक सुरु असली तरी नळदुर्ग शहरातून जाणारी बसवाहतूक तसेच ग्रामीण भागातील वाहनांची ये-जा याच मार्गावरून होते. अंधारामुळे अपघातांचा धोका वाढत असून एखाद्या लहान वाहनाला मोठे वाहन धडक देऊन पसार झाले तरी ते कुणाला लक्षात येणार नाही, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

दि.२ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत मैलारपूर येथे श्री खंडोबा देवाची प्रसिद्ध यात्रा होणार असून हजारो भाविक नळदुर्गमार्गे प्रवास करणार आहेत. त्यामुळे यात्रेपुर्वी गोलाई चौक ते बसस्थानकापर्यंतचे पथदिवे तात्काळ सुरु करावेत, अशी मागणी हजारे यांनी केली आहे.

याकडे दुर्लक्ष झाल्यास राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

पथदिवे बंद असल्यामुळे ऐतिहासिक नळदुर्ग शहराचे नाव बदनाम होत असून याला पूर्णपणे राष्ट्रीय महामार्ग विभागच जबाबदार असल्याचा आरोपही सुधीर हजारे यांनी केला आहे.

# कळंब न.प. निवडणुकीत तिरंगी लढत : विजयी कोण? होणार; चर्चांना उधाण




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ डिसेंबर -**

कळंब नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (दोन्ही पवार गट), भाजप-शिवसेना (शिंदे गट) आणि काँग्रेस आय-शिवसेना (उबाठा) यांच्यात तिरंगी लढत झाली. मतदानानंतर शहरात राजकीय चर्चांना उधाण आले असून तिन्ही आघाड्यांकडून विजयाचे दावे-प्रतिदावे सुरूच आहेत. काही प्रभागांमध्ये 'काटे की टक्कर' झाल्याचे चित्र दिसत असल्याने अंतिम कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



निवडणुकी नंतर सर्व ईव्हीएम मशीन कडेकोट बंदोबस्तात कळंब येथील संत गोरोबाकाका कुंभार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ठेवण्यात आल्या आहेत. मतमोजणी दि.२१ डिसेंबर रोजी याच ठिकाणी होणार असून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात आहे.

**वार्तापत्र...**
**परवेज मुल्ला**

शहरातील १० प्रभागांमधील २४ मतदान केंद्रांवर झालेल्या मतदानात एकूण २०,९५८ मतदारांपैकी १५,२३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

मतदानाची टक्केवारी ७२.६९ टक्के इतकी नोंदली गेली असून वातावरण उत्साहपूर्ण होते. निकालासाठी फक्त काही दिवस उरले असल्याने उमेदवार, कार्यकर्ते आणि समर्थक आकडेमोडीमध्ये गुंतले असून 'कोठे किती मते मिळाली? कोणाची घसरण-वाढ?' यावरून तर्क-वितर्क सुरू आहेत.

शहरातील प्रमुख चौकांपासून सोशल मीडियापर्यंत सध्या 'कोण होणार नगराध्यक्ष?' या प्रश्नावर चर्चा रंगत आहे.

आता २१ डिसेंबर रोजी कोणाचा विजय निश्चित होतो, कोणत्या आघाडीची जुळवाजुळव जमते आणि कळंबचे पुढील पाच वर्षे कोणाच्या नेतृत्वाखाली जाणार-याकडे तालुकावासियांचे लक्ष वेधले आहे.

**नगराध्यक्षपदासाठी प्रमुख दावेदार...**

- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (दोन्ही पवार) : **प्रा. मिनाक्षी भवर**
- काँग्रेस आय - शिवसेना (उबाठा) : **रश्मी मुंदडा**
- शिवसेना (शिंदे) - भाजप आघाडी : **सुनंदा कापसे**

# औसा मतदारसंघात 'अस्मिता भवन' उभारणीला गती

## आ.अभिमन्यू पवारांच्या पाठपुराव्याला उपमुख्यमंत्री अजित पवारांचा सकारात्मक प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ९ डिसेंबर :** औसा मतदारसंघातील महिलांना सुरक्षित, स्वतंत्र आणि हक्काची जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित 'अस्मिता भवन' प्रकल्पाला गती मिळत असून महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देणारा हा उपक्रम शासनाच्या अभिसरणातून मंजूर व्हावा. यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थ आणि नियोजन मंत्री अजित पवार यांची भेट घेऊन सविस्तर पाठपुरावा केला असता येर्णाय़्या दोन दिवसात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्णय घेणार आसल्याचे आश्वासन दिले आहे.

पहिल्या टप्यात औसा मतदारसंघातील ९३ गावांमध्ये अस्मिता भवन उभारण्यासाठी अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मात्र या प्रकल्पासाठी आमदार निधी किंवा जिल्हा वार्षिक योजना निधी अनज्ञेय नसल्यामुळे निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीवर उपाय शोधण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

आमदार अभिमन्यू पवार यांनी अभिसरणातून या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची विनंती उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या उपक्रमाचा सकारात्मक विचार करून पुढील दोन दिवसांत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्णय करण्याचे आश्र्वासन दिले. या चर्चेला मंत्री धनंजय मुंडेही उपस्थित होते.

गावागावातील महिलांना आजही बचत गटांची बैठक घेण्यासाठी योग्य, सुरक्षित व स्वच्छ जागा उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती अधोरेखित करत आमदार पवार म्हणाले, औसा मतदारसंघातील प्रत्येक गावात अस्मिता भवन उभारण्याचा माझा संकल्प मी व्यवहारात आणणार आहे. महिला संघटनांना सशक्त व्यासपीठ मिळणे ही काळाची गरज आहे.असे मत पाठपुराव्यादरम्यान आ. पवार यांनी व्यक्त केले.

अस्मिता भवन उभारणीसाठी एकूण ४२ लाख रुपये खर्च अपेक्षित असून निधीची रचना आमदार निधी १० लाख रुपये, जिल्हा वार्षिक, योजना १५ लाख रुपये, नरेगा अभिसरण : १७ लाख रुपये सुमारे २००० चौ.फुट क्षेत्रावर बांधल्या जाणाऱ्या अस्मिता भवनमध्ये ग्रामसंघ पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यालय, मोठा मीटिंग हॉल, बचत गटांच्या उत्पादन विक्रीसाठी दोन गाळे, स्वच्छतागृहे अशा सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध असणार आहेत.

अस्मिता भवन केवळ एक इमारत नसून गावातील महिलांच्या स्वावलंबन, संघटन आणि आर्थिक प्रगतीसाठी भक्कम पायाभूत सुविधा ठरेल, असा विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे. या निर्णयामुळे औसा मतदारसंघातील महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.



# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे अनुदान तात्काळ जमा करा : डॉ. भिकाणे

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ९ डिसेंबर :** अतिवृष्टीमुळे मिळणारे शासकीय अनुदान अद्यापही अनेक




शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला असून ते तात्काळ जमा करण्यात यावे यासाठी मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी निलंगा तहसीलदार कुलकर्णी यांची भेट घेत शिष्टमंडळासहित रीतसर निवेदन दिले.

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे निलंगा तहसीलदारांना निवेदन

निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मागील हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाच्या नियमांनुसार पंचनामे पूर्ण झाले असून अनुदान मिळण्यास शेतकरी पात्र आहेत.तरीसुद्धा आज दिनांक ९/१२/२०२५ पर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर कोणतेही अनुदान जमा झालेले नाही.

या संदर्भात ग्रामसेवक/तलाठी यांच्याशी संपर्क साधला असता ते शेतकऱ्यांना उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.यामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे कारण शेतकऱ्यांच्या शेतीवर कर्ज, बियाणे, खते, पिक विमा प्रीमियम आणि दैनंदिन खर्च यांचा मोठा बोझा झाला असून, वेळेवर अनुदान न मिळाल्याने सावकार शेतकऱ्यांच्या गळ्याचा फास अवळतायत की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच प्रशासनाने अनुदान प्रकरणाची तात्काळ चौकशी करून विलंब का होत आहे याचा लेखाजोखा घेत, जिममेदर अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी व लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करावे. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाभर चक्का जाम आंदोलन करेल असा इशाराही मनसे जिल्हाध्यक्ष डॉ. भिकाने यांनी दिला आहे.यावेळी

तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार, सूरज पटेल, प्रदीप शेळके, विकास सूर्यवंशी, बालाजी पवार, सोमलिंग पाटील, गणेश उसनाळे, सदाशिव हाडोळे, शिवराज चिंचोळे, बालाजी खिचडे, नरसिंग महालिंग, महेश सावनगिरे, संतोष जाधव, शंकर चव्हाण, सुधीर चव्हाण आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आवाळे



**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ९ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ येथे होणाऱ्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आयोजक संस्थेचे अध्यक्ष एल. बी. आवाळे यांची निवड झाली आहे. येत्या २७ व २८ डिसेंबर रोजी हे संमेलन शिरूर अनंतपाळ येथें होणार आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून होणारे जिल्हा साहित्य संमेलन आयोजित करण्याची संधी यावर्षी शिरूर अनंतपाळ येथील श्री. अनंतपाळ नवयुवक वाचनालयास मिळाली आहे. या संमेलनाच्या संदर्भात आयोजक संस्थेच्या कार्यकारिणी ची बैठक होऊन स्वागताध्यक्षपदी एल. बी. आवाळे यांची निवड करण्यात आली आहे. एल. बी. आवाळे यांचे शैक्षणिक, सामाजिक शिक्षक चळवळीत योगदान राहिले आहे. शिरूर अनंतपाळ येथें होणारे हे पाचवे संमेलन असून हे संमेलन यशस्वी करू असा विश्वास आवाळे यांनी व्यक्त केला.

# मंचकराव पाटील यांच्या हस्ते सोयाबीन खरेदी शुभारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ९ डिसेंबर :** कृषि पणन मंडळ पुणे/विभागीय कार्यालय लातूर तर्फे कृषि उत्पन्न बाजार समिती अहमदपर, मुख्य बाजार आवार (मार्केट यार्ड) येथे सोयाबिन खरेदी केंद्राचे दि.०८ डिसेंबर रोज सोमवारी मंचकराव पाटील सभापती, कृषि उत्तपन्न बाजार समिती अहमदपूर यांचा हस्ते उद्धाटन करण्यात आले. शेतकऱ्यांना त्रास होऊ नये यासाठी काळजी घेण्यात येणार असल्याचे सभापती मंचकराव पाटील यांनी सांगितले.

सोयाबीन खरेदी केंद्र उद्धाटन प्रसंगी उपसभापती संजय पवार, आणि कार्यक्रमप्रसंगी सर्व मान्यवर संचालक रामदास कदम, बालाजी कातकडे, सतीश नवटक्के, किसन पाटील, संतोष रोडगे, कैवल्याबाई नागमोडे, इंदुताई पवार , रामचंद्र मद्दे, यशवंत केंद्रे, शिवाजी पाटील, जीवनकुमार मद्देवाड, अण्णासाहेब कांबळे, शिवाजी खांडेकर, धनराज पाटील, विलास शेट्टे, मुस्तफा सय्यद व सचिव ओम उगिले, सहाय्यक सचिव राजेंद्र कासले, सर्व कर्मचारी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या शेतकऱ्यांसाठी सोयाबीन नोंदणी करणे सुरू करण्यात आले असून शेतकऱ्यांनी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सातबारा, आठ अ, पीक पेरा, आधार कार्ड, बँक पासबुक घेऊन स्वतः शेतकऱ्यांनी उपस्थित राहणे आवशयक आहे. सोयाबीन नोंदणी केलेल्या व संदेश आलेल्या शेतकरी बांधवानी सोयाबीन शेतमाल कृषि उत्पन्न बाजार समिती अहमदपूर (मार्केट यार्ड गोदाम) केंद्रावर विक्रीस आणावा असे आहवान सभापती मंचकराव पाटील आणि कृषि उत्तपन्न बाजार समिती अहमदपूर तर्फे करण्यात आले आहे.

# ओंकार साखर कारखान्याकडून २९०० प्रमाणे पहीली उचल

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ९ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथील शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लि. लिज ओंकार साखर कारखाना यूनिट नं. २ कारखान्याच्या वतीने गळीत हंगाम सन २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास एफआरपी पोटी पहिला हप्ता प्रति मेट्रीक टन २ हजार ९०० रुपये प्रमाणे ऊस बिल हप्ता देण्याचे ठरले असल्याची माहिती कारखान्याच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.



कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंबुलगा (बु) येथील ओंकार साखर कारखाना यूनिट नं. २ या कारखान्याचा सन २०२५-२६ गळीत हंगाम यशस्वीपणे सुरू आहे. ०८ डिसेंबर अखेर कारखान्याचे गाळप ८८ हजार मे टन. इतके झाले आहे.

यंदाच्या गळीत हंगामात ३० नोव्हेंबर २०२५ अखेर गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपी ट्रमाणे प्रति मे टन २ हजार ९०० रुपये प्रमाणे ऊस पुरवठादार शेतकरी यांना अदा करण्यात येणार आहे.

हा दर अंतिम नाही याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी. तसेच मागील वर्षानुसार याही वर्षी गळपास आलेल्या ऊसास कारखाना धोरणानुसार दीपावली सणानिमित्त मोफत साखर वाटप करण्याचे कारखाना व्यवस्थापनाने ठरवले आहे.

चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून कारखाना व्यवस्थापन प्रयत्नशील आहे. सध्या मोठ्या प्रमाणात शेतकरी या कारखान्याला ऊस घालत आहेत ओंकार कारखान्यामुळे कारखानदारातील मक्तेदारीला यानिमत्ताने ब्रेक लागला आहे.

# श्रीराम मंदिराजवळील चढ ठरतोय जिवघेणा

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ९ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील मुख्य रस्तावर उदगीरकडे जाताना श्रीराम मंदिराजवळ हा रस्ता खूप उंचीचा आणि वळणाचा असून या रस्त्यावर वाहनांची दिवस रात्र सततची वर्दळ असते. सध्या साखर कारखान्याला ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असून या रस्त्याच्या उंचीमुळे ऊस वाहतूक वाहाणासह इतरही लोडींगची वाहाणे या चढामुळे उलट मागे येऊन पलटी होत आहेत. नुकतेच या रस्त्यावर ऊस वाहतूक ट्रॅक्टर ट्रालीसह भररस्त्यात पलटी पडले सुदैवाने मागे वाहाण नसल्यामुळे कोणतेही हाणी झाली नाही. या आगोदर या रस्त्यावर असेच वाहाणे पलटी होऊन बरेच आपघाताचे प्रकार अनेक वेळा घडले आहेत. या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारास सदरील रस्त्याची उंची कमी करुन त्वरित रस्ता दुरुस्त करण्याची



विनंती तानाजी महाराज दाडगे यांच्या सह नागरिकांनी मागणी केली आहे.

येरोळ हे गाव मुख्य रस्त्यावर वसलेले असून चाकूर, येरोळमोड मधला मार्ग साकोळ, वलांडी पुढे कर्नाटक राज्यातील आळवाई, बसवकल्याण, गुलबर्गा येथे हा रस्ता जातो या रस्त्यावर दोन राज्याला जोडणारा अतिमहत्वाचा रस्ता असून या रस्त्यावर दिवस रात्र ऊस वाहतूक व इतरही अवजड वाहानाची सततच्या वाहतूकीची वर्दळ असते. येरोळ गावातील मुख्य रस्त्यावर उंच चढाव असल्याने वाहतूक वाहनधारकांना मोठा त्रास होत असून आपघाताचे प्रकार सतत घडत आहेत. हा रस्ता गावच्या मधोमध आहे दोन्ही बाजूला

### प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज

घरे असल्याने येथील रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या स्थळापासुन जवळच शाळा आहे. वरदळीच्या ठिकाणी हा चढ असुन नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या या रस्त्याची दुरुस्ती व मजबूतीकरणासह डांबरीकरण करण्याचे काम सुरू आहे सदर रस्ताची तालुका व जिल्हा बांधकाम विभाग वरिष्ठ अधिकारी यांनी पाहाणी करून सदरच्या रस्त्यावरील उंची कमी करुन रस्ता दुरुस्ती करून वाहतूकीसाठी सुरुळीत करुन द्यावे अशी मागणी येरोळसह परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# स्वातंत्र्यलढ्याचं स्फूर्तीगीत म्हणजे वंदे मातरम् होय : बिलोलीकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ९ डिसेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात बाळासाहेब दीक्षित प्रतिष्ठान तर्फे राष्ट्रीय गीत वंदे मातरम् सार्धशती




समारोह सोहळा उत्साहात संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर प्रमुख वक्ते मिलिंद बिलोलीकर स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासुणे ,रुक्मण पेन्सलवार, डॉ अंबादासराव देशमुख प्रमोदराव कुलकर्णी विभावरी दंडवते मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपस्थित होते. याप्रसंगी वंदे मातरम गीत फलकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मिलिंद बिलोलीकर यांनी वंदे मातरम् गीताचा अर्थ देशभक्तीचे प्रतिक म्हणजे वंदे मातरम् असे पटवून सांगितले.या देशात सावरकर ,प्रभू राम स्वामी विवेकानंद जन्मले आणि त्यांनी भारत मातेसाठी कार्य केले. वंदे मातरम् हे केवळ गीत नसून स्वातंत्र्य लढ्याचं ते स्फूर्तिदायक गीत ठरलं.त्यातून अनेक देशभक्त व क्रांतिकारक निर्माण झाले.त्यामुळे वंदेमातरम या गीताचं स्वातंत्र्य लढ्यात अनन्यसाधारण महत्व राहिलं असल्याचे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ सुरेंद्रजी आलूरकर यांनी याप्रसंगी वंदे मातरम् या गीताचे बिजारोपण आपल्या आयुष्यात झालेलं असून आपण ते कधीच विसरणार नाही. वंदे मातरम् गीताने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावलीअसल्याचे सांगितले. याप्रसंगी डॉ रघुनाथराव दंडवते यांच्या स्मृतीला उजाळा दिला.त्यांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या विकासासाठी दिलेलं योगदान न विसरता येण्यासारखे आहे.अशी भावना डॉ. सुरेंद्र आलूरकर यांनी मांडली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती शेंडे स्वागत व परिचय अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे , प्रास्ताविक देवेंद्र देवणीकर यांनी केले. वैयक्तिक गीत अक्षरा दुरूगकर या विद्यार्थिनीने गायले . तर आभार लक्ष्मीकांत नेलवाडकर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी बाळासाहेब दीक्षित प्रतिष्ठानचे सदस्य व निवृत्त शिक्षक यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट माधव मठवाले कार्यक्रम प्रमुख आशा कल्पे यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पोलीस संघटनेचा नागपुरात आज मोर्चा

**उदगीर :** राज्यातील पोलीस पाटील संघटनेतर्फे पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांसाठी बुधवारी (दि. १०) नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर पोलीस पाटील गावकामगार संघांचे राज्यध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील पाटील यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात सहभागी होण्यासाठी लातूर जिल्ह्यातील पोलीस पाटलांची नुकतीच लातूर येथे एक बैठक पार पडली असल्याचे पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष भालचंद्र शेळके पाटील उद्या यांनी सांगितले. पोलीस पाटील यांचे सेवानिवृत्तीचे वय ७० वरून ६५ करण्यात यावे, सेवानिवृत्तीनंतर सन्मान निधी देण्यात यावा, पोलीस पाटील यांचे नूतनीकरण कायमचे बंद करावे, पोलीस पाटील यांचा अकस्मात मृत्यू झाल्यास त्या परिवारास सानुग्रह निधी देण्यात यावा आदींसह मागण्यांसाठी पोलीस पाटलांचा मोर्चा बुधवारी विधानभवनावर धडकणार आहे आहे.

# शिरूर अनंतपाळ येथे महामानवाला अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ९ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ (जि. लातूर) येथे ६ डिसेंबर २०२५ रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना कोटी-कोटी प्रणाम व अभिवादन करण्यात आले. तालुका विधायक कृती समिती तर्फे तहसील कार्यालयासमोर हा कार्यक्रम मोठ्या श्रद्धा व सन्मानाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला तालुका विधायक कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राम काकडे यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. समाजशास्त्र अभ्यासक बालाजी जगताप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या प्रसंगी प्रा. काकडे यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या राष्ट्रीय योगदानाबद्दल सविस्तर प्रकाश टाकला. संविधान आणि आजचे राजकारण तसेच सामाजिक परिवर्तनासाठी बाबासाहेबांचे विचार किती महत्त्वाचे आहेत, हे समाजाने सदैव लक्षात ठेवले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की आज समाज संविधानाशिवाय एक क्षणदेखील जगू शकत नाही. संविधान जिवंत ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची




जबाबदारी आहे.

कार्यक्रमाला तालुक्यातील अनेक गावांमधून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यामध्ये बालाजी जगताप, निवृत्ती सुर्यवंशी, नागनाथ कांबळे, गौतम कांबळे, रमेश सोनवणे, माधव आवळे (शिरूर अनंतपाळ), महेश सगरे द्रोपद कांबळे (अंभलगा), सुनिल शिंदे, माजी सरपंच नरसिंग राजूरकर, विधायक कृती समितीचे कार्याध्यक्ष उत्तम कदम आदी मान्यवरांचा सहभाग होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...



### पिंक पथकाने दिले विद्यार्थ्यांना 'गुड-बॅड' टच मार्गदर्शन

**तुळजापूर, दि.९ डिसेंबर -**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय अंतर्गत पिंक पथकाने विद्यार्थ्यांना भेट देऊन संवाद साधला. या वेळी महिला पोलीस सोनाली जाधव आणि उज्वला भोजगुडे यांनी विद्यार्थ्यांना गुड टच व बॅड टच याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, आपल्याला किंवा आपल्या परिसरात काही अनुचित घटना घडल्यास तात्काळ पोलिसांकडे ११२ या नंबरवर संपर्क साधावा. तसेच, कोणत्याही त्रासाच्या प्रसंगी विलंब न करता पोलीस संपर्क साधण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात सुज्ञानी गिराम यांनी पिंक पथकाचे स्वागत केले आणि विद्यार्थ्यांना पथकाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये आणि पथकातील पोलिसांमध्ये अनेक विषयांवर सकारात्मक संवाद झाला. या कार्यक्रमाचा आभार श्रावणी शिंदे यांनी मानला.

### २०२६ ग्रंथपालन प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**तुळजापूर, दि.९ डिसेंबर -**

सन २०२६ साली सुरू होणाऱ्या ग्रंथपालन प्रवेश प्रक्रियेला तुळजापूरमध्ये सुरुवात झाली आहे. हा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचनालय, उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र प्रत व शुल्कासह प्रवेश अर्ज दाखल करावा. या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता फक्त ५० विद्यार्थ्यांपुरती मर्यादित आहे. प्रवेश अर्जासाठी संपर्क साधण्याचे ठिकाणे व.ग. सुर्यवंशी, पर्णकुटी, शुक्रवार पेठ पाणी टाकी, तुळजापूर, हनुमंतराव भुजबळ, यशतरावंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, सुरेश जोशी, ग्रंथपाल, विजय वाचनालय, तुळजापूर, विनायक मस्के, श्री तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### हणमंत शेटे यांचे निधन

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**



तालुक्यातील उपळे (मा) येथील हणमंत भिमराव शेटे ( वय ८९) यांचे मंगळवार दि.९ डिसेंबर रोजी पहाटे ५:३० वाजण्याच्या सुमारास वर्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी उपळे (मा) येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई, ३ भाऊ, १ बहिन असा मोठा परिवार आहे. ते पत्रकार संतोष शेटे यांचे वडील होते.

# नळदुर्ग परिसरात विजसाहित्य चोरीचे चार गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

गंधोरा पाटी व परिसरात गेल्या काही महिन्यांत विजसाहित्य चोरीच्या सलग घटनांची नोंद झाली आहे. रिन्यू ग्रीन एनर्जी सोल्युशन्स प्रा. लि. या कंपनीच्या विविध ठिकाणच्या यंत्रसामग्री व विजवाहिन्यांमधून अज्ञात चोरट्यांनी मोठ्या प्रमाणात साहित्य लांबवल्याचे उघड झाले आहे. यासंदर्भात कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी रावसाहेब भानुदास शेंडे (वय ४३, रा. हरोली, ता. कवठे महाकाळ, जि. सांगली, ह.मु. एसटी कॉलनी तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलिसांनी भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये स्वतंत्र चार गुन्हे नोंदवले आहेत.



दि. १७.१०.२०२४, वेळ ११.०० पूर्वी, गंधोरा पाटी येथे कन्व्हर्टर पॅन, क्सेसरीज, कंट्रोल्स, सेफ्टी चैन, सप्लाय केबल, रोटर पावर केबल, कन्व्हर्टर पॅनलची केबल्स, नेटवर्क केबल, १५ मीटर स्काउा केबल, टॉवर लिमिट स्वीच केबल, अर्थिंग स्ट्रिप आदी साहित्य एकूण १ लाखाचे चोरून नेण्यात आले.

दि.९ ऑक्टोंबर २०२४, वेळ ११, गंधोरा पाटी येथील आरएसएल-२७ ट्रान्सफॉर्मरमधील आयल व इतर सर्व क्सेसरीज एकूण ९५ हजारांचे चोरून नेण्यात आले.

दि.१ जून २०२४ रात्री २३ ते दि.२ जून २०२४ पहाटे ५ वाजता सलगरा ते शिमदरा तांडा (२.५ किमी) परिसरातील आरएसएल-६८ ते ३३ केव्ही सबस्टेशनदरम्यानच्या विजवाहिनीची २.५ किमी लांबीची केबल (९० हजार) चोरून नेण्यात आली.

दि.२४ फेब्रुवारी संध्याकाळी २०.३० ते दि.२५ फेब्रुवारी सकाळी ११, संबंधित गावांच्या हद्दीत उभारलेल्या RUL-२४ ते २२ जोडण्यासाठीच्या पँथर लाईनचे ८ पोलवरील ८४० मीटर कंडक्टर वायर (८० हजार) चोरून नेण्यात आली.

या चारही घटनांप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले असून चोरट्यांचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र देण्यात अडथळे

**ज्येष्ठ नागरिक महासंघाकडून तहसीलदारांना निवेदन**



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ डिसेंबर -**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन, आरोग्य सुविधा, मोफत औषधोपचार तसेच विविध सवलती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला असून, त्याची अंमलबजावणी ५ डिसेंबरपासून सुरू करण्यात आल्याचे घोषित केले आहे.

या सर्व योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ६० वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना 'ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र' अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, हे ओळखपत्र कळंब तहसील कार्यालयामार्फत देण्यात येत नसल्याची बाब समोर आली आहे. सध्या ही ओळखपत्रे धाराशिव तसेच इतर तहसील कार्यालयांमार्फत दिली जात असल्याचे ज्येष्ठ नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. या गंभीर समस्येबाबत कळंब तहसील कार्यालय तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी करत ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने नायब तहसीलदार गोपाळ तापडिया यांना निवेदन सादर करण्यात आले.

या मागणीसाठी निवेदन देताना जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, जिल्हा उपाध्यक्ष अच्युतराव माने, तालुका सचिव माधवसिंग राजपूत, कार्यकारिणी सदस्य रामभाऊ कवडे, बशीर पठाण, गुलाब बागवान, कल्याण खापे आदी उपस्थित होते.

## संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयात प्रतिमा पूजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ डिसेंबर -**

श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या ४०१ व्या जयंतीनिमित्त उपविभागीय अधिकारी कार्यालय, कळंब येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, नायब तहसीलदार गोपाळ तापडिया, नायब तहसीलदार गोकुळ भराडिया, किरण फुले तसेच कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. यानंतर तहसील कार्यालय, कळंब येथे आयोजित कार्यक्रमातही संताजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नायब तहसीलदार गोपाळ तापडिया, नायब तहसीलदार पंडित जाधव, शिल्पा माळवे, पवार आर. डी., कदम एस.एस., सोनवणे एस.एस., रणदिवे व्ही.के. आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास तेली समाज सेवा भावी संघ कळंबचे माजी शहराध्यक्ष अशोक चिंचकर तसेच कार्यालयातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोहाऱ्यात एड्स दिनानिमित्त बाईक रॅलीद्वारे जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.९ डिसेंबर -**

जागतिक एड्स दिन आणि पंधरवड्याच्या निमित्ताने दि. ९ डिसेंबर रोजी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय धाराशिव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालय, लोहारा तर्फे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.



रॅलीचे उद्घाटन वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र पापडे व पोलीस निरीक्षक विजय पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने लढा देऊ; समाज घडवू अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील मंडले, डॉ. अदिती खमीतकर, जिल्हा क्षयरोग पर्यवेक्षक शरद बोने व त्यांची टीम-संतोष कुंभार, अभय भालेराव-तसेच रुग्णालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. रुग्णालय परिसरात महिला कर्मचाऱ्यांनी एड्स जनजागृतीवर आधारित आकर्षक रांगोळी काढून रॅलीची शोभा वाढवली.

जगदंबा मंदिर ट्रस्ट, भानुदास चव्हाण महाविद्यालय आणि शंकरराव जावळे पाटील महाविद्यालयातील युवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून जात असताना प्रतिबंधक फलक, घोषणाबाजी आणि संदेशपत्रके यांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. उद्धव कदम यांनी केले, तर सूत्रसंचालन जिल्हा पर्यवेक्षक महादेव शिंगारे यांनी केले. या जनजागृती उपक्रमासाठी तानाजी बचाटे, जिल्हा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रवीण कांबळे, समुपदेशक सुधीर रोडगे, युवराज मोरे, समुपदेशक आदींनी परिश्रम घेतले.

# 'जयप्रकाश'ची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात चमकदार यश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील विद्यार्थ्यांनी ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उल्लेखनीय कामगिरी करत प्राथमिक गटात प्रथम क्रमांक, तर माध्यमिक गटात तृतीय क्रमांक पटकावला. दोन्ही गटांची जिल्हा पातळीवरील निवड झाल्याने विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

दि.८ डिसेंबर रोजी धाराशिव येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयात झालेल्या या प्रदर्शनात एकूण १२३ प्रयोग सादर झाले. त्यामध्ये जयप्रकाश विद्यालयाच्या प्राथमिक गटातील विद्यार्थिनी कुमारी श्रावणी बाबासाहेब ढोले व तनुजा उमाकांत नलावडे यांनी शाश्वत शेती या विषयांतर्गत सेंद्रिय शेतीतील अमृत-वर्मी-वॉश हा प्रयोग सादर करून प्रथम क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनींना नेताजी धुमाळ, अभिजीत घोळवे आणि अभिनंदन आखाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

माध्यमिक गटात वैष्णवी गजेंद्र एकंडे व सुमती दशरथ कस्पटे यांनी जल व्यवस्थापन व संवर्धन या विषयावर प्रयोग सादर करून तृतीय क्रमांक पटकावला. या गटाला रामराजे लावंड, प्रसन्न धमाधिकारी, मयुरी वडाळ आणि अरुण गुंड यांचे मार्गदर्शन मिळाले. दोन्ही गटातील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करत त्यांना आगामी जिल्हा पातळीवरील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीस महाराष्ट्र गौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ डिसेंबर -**

आनंदी युनिव्हर्सल फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र गौरव पुरस्कार तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीला प्रदान केला जाणार आहे. हा सन्मान दहा डिसेंबर रोजी पुणे येथील जवाहरलाल नेहरू सभागृह येथे दिला जाईल.

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्गासाठी २००६ पासून २०२५ पर्यंत विविध माध्यमांतून चालवलेल्या आंदोलनाबद्दल हा गौरव पुरस्कार देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले आहे. समितीच्या सदस्यांमध्ये बबन गावडे, विकास तांबे, रत्नाकर खोले, अशोकराव साळुंखे, अंबादास पोपळे, अनिल हंगरगेकर, मोहन भोसले, सतीश पवार, राहुल गवळी, खयूम शेख, अनमोल साळुंखे, गोविंद दिवटे, दयानंद पांचाळ, कोंडीबा प्रताप लायक सय्यद, राऊफ शेख यांचा समावेश आहे.

# बेंबळी महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी उपाययोजनांची मागणी

**शिवराज्याभिषेक समितीचे अधिष्ठात्यांना निवेदन...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

धाराशिव-बेंबळी महामार्गावर सातत्याने होणारे अपघात आणि त्यातून होणारी जीवित व वित्तहानी लक्षात घेता शिवराज्याभिषेक सोहळा समिती, धाराशिव यांच्या वतीने विविध उपाययोजनांची मागणी करण्यात आली. समितीच्या प्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिवच्या अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देऊन बॅरिकेट्स उभारणे, स्पीड ब्रेकर तयार करणे, दिशादर्शक फलक बसवणे आणि वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी केली. दाट लोकवस्ती असलेल्या या परिसरात वारंवार अपघात होत असल्याने तातडीच्या उपाययोजनांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

याच अनुषंगाने समितीच्या सदस्यांनी दुसरे निवेदन शासकीय वैद्यकीय आयुर्वेदिक रुग्णालय व महाविद्यालयाच्या अधिष्ठाता यांना दिले.

धाराशिव शहरातून राष्ट्रीय महामार्ग आणि इतर राज्य मार्ग जात असल्याने अपघातांची संख्या जास्त असून, अपघातग्रस्तांना प्राथमिक उपचारांसाठी शासकीय रुग्णालय गाठावे लागते. वाहतूक कोंडीमुळे अनेकदा तातडीची उपचार प्रक्रिया उशिरा सुरू होत असल्याने जीवितहानीची शक्यता वाढते, अशी चिंता समितीकडून व्यक्त करण्यात आली.

नागरिकांच्या मागणीचा उल्लेख करत समितीने सांगितले की अपघातग्रस्तांना त्वरित उपचार मिळावेत यासाठी आयुर्वेदिक रुग्णालयात २४ तास चालणारा कॅज्युअल्टी विभाग आणि एक वैद्यकीय अधिकारी कायम उपस्थित ठेवण्यात यावा. महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या सेवांची आवश्यकता अत्यंत तातडीची असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले.

या निवेदनप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष हनुमंत यादव, सचिव आकाश भोसले, शहराध्यक्ष संतोष घोरपडे, तसेच हनुमंत तांबे, अमोल साळुंके, योगेश आतकरे, रामानंद माडेकर, प्रथमेश जगदाळे, अनंत झाडके, व्यंकटेश पडिले आदी सदस्य उपस्थित होते.

# तुळजाई नगरीतील नाट्यपरंपरेला ब्रेक! : पंचरंगची कलाज्योत पुन्हा कधी प्रज्वलित होणार? शहराला अद्ययावत नाट्यगृहाची गरज




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**

अवघ्या विश्वाची जगतजननी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेच्या पवित्र दर्शनाने जिवाला समाधान मिळते, पण तिच्या नगरीतल्या रंगभूमीच्या अध:पतनाने मन मात्र हळहळते. तुळजापूरची सांस्कृतिक ओळख कधी काळी जितक्या तेजाने उजळत होती, तितकीच आज फिकट होताना दिसते. एकेकाळी पंचरंग प्रतिष्ठानच्या प्रयोगांनी गाजणारी ही नगरी आज शांततेत बुडून जात आहे आणि ही शांतता कलावंतांच्या न बोललेल्या आक्रोशाने भरलेली आहे.

पंचरंग प्रतिष्ठानने तुळजापूरच्या नाट्यसृष्टीला कधी काळी नवी संजीवनी दिली होती.श्रीक्षेत्र तुळजापूर येथे 'पंचरंग' ची स्थापना मराठी रंगभूमीदिनाच्या शुभमुहूर्तावर ५ नोव्हेंबर, १९८५ रोजी श्रीकांत नाडापुडे, प्रकाश हुंडेकरी, कांता शामराज, डी. एस. हंगरगेकर आणि संजय कवठेकर या हौशी नाट्यकलावंतांनी केली. पंचरंग प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून तयार झालेले कलावंत मंडळी आजही सिनेसृष्टीत व रंगभूमीवर समृद्ध काम करत आहेत. परंतु प्रतिष्ठानची ती ऊर्जात्मक कलाज्योत पुढे नेण्याच्या वाटा मात्र हळूहळू अंधाऱ्या झाल्याचे दिसून येत आहेत. विद्यापीठ आणि राज्यस्तरावरील सांस्कृतीक क्षेत्रात तुळजापूरातील महाविद्यालयांचा कायमस्वरूपी दबदबा हा अभिमानाचा विषय होता. नाटक, अभिनय, स्पर्धा, प्रयोग यांचे वारे वाहणारी पंचरंग ही संस्था असंख्य कलाकारांची जन्मभूमी बनली. दिलीप भोसले,संभाजी भोसले,उमेश जगताप,शंतनू गंगणे,योगेश राऊत, खाजाभाई सय्यद ही फक्त काही उदाहरणे. या कर्तृत्वामागे एकच गोष्ट होती. स्थित्यंतर करणारा पंचरंगचा नाट्यमंच. सांस्कृतिक समृद्धीच्या या भूमीत आजही एकही दर्जेदार नाट्यगृह नाही, हा तुळजाई नगरीचा सर्वात मोठा विरोधाभास ठरतोय, कलावंत आहेत,कला आहे, रसिकही आहेत, उणीव आहे तर व्यासपीठाची. मंच नसल्याने नाटक जन्म घेतेच कसे ? प्रयोग कुठे घडावेत ? कलाकारांना घडवणाऱ्या कार्यशाळा कुठे व्हाव्यात ? नाट्यगृहाचा अभावामुळे प्रतिभेची ही भूमी भूकेली दिसून येते आहे. तुळजापूर शहरात एक अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज नाट्यगृह उभारण्याची मागणी स्थानिक कलावंत, सांस्कृतिक संस्था आणि नागरिकांकडून अधिक जोर धरत आहे. सध्या शहरात मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक उपक्रमासाठी स्वतंत्र, सुसज्ज आणि सुरक्षित व्यासपीठाची कमतरता जाणवत असल्याने ही सुविधा केवळ 'तातडीची' नाही, तर 'अत्यावश्यक' असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.



**अनिल आगलावे**
मो. ९७६७०९९७११

पंचरंग प्रतिष्ठानतर्फे घेतले जाणारे उपक्रम केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता सामाजिक भान जागवणे, स्थानिक कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि नवोदित कलाकारांना मार्गदर्शन करणे या त्रिसूत्रीवर आधारित असल्याने नागरिकांकडून संस्थेच्या कार्याचे कौतुक होते. विविध स्पर्धांमध्ये स्थानिक कलाकारांनी मिळवलेले यश, आयोजित केलेल्या प्रयोगांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि कलासंवर्धनातील सातत्य यामुळे पंचरंग प्रतिष्ठानने सांस्कृतिक क्षेत्रात स्वत:ची स्वतंत्र छाप निर्माण केलेली आहे. पंचरंग प्रतिष्ठान क्रीडा क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करत असते. संस्थेच्या माध्यमातून गतवर्षी प्रथमच राज्यस्तरीय एकांकिका लेखन स्पर्धा घेतली गेली. आगामी काळात अधिक व्यापक स्वरूपात उपक्रम राबवून कला-संस्कृतीला नवे आयाम देण्याचा प्रतिष्ठानचा मनोदय संस्थापक टीमच्या सदस्यांनी बोलून दाखवला असून तुळजापूरच्या सांस्कृतिक नकाशावर संस्थेचे योगदान आणखी बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तुळजापूरचे धार्मिक, ऐतिहासिक आणि शैक्षणिक महत्त्व लक्षात घेता शहराकडे वाढत्या सांस्कृतिक चळवळीची क्षमता आहे. अशा वेळी आधुनिक नाट्यगृहाची उभारणी झाल्यास स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळेल, सांस्कृतिक पर्यटनालाही चालना मिळेल तसेच शहराच्या विकासातही भर पडेल, असा विश्वास विविध सांस्कृतिक संस्थांनी व्यक्त करत आहेत.

### पंचरंग प्रतिष्ठान : एक सुवर्णकाळ

स्थानिक पातळीवर नाट्य, संगीत, ललितकला आणि सांस्कृतिक उपक्रमांचे सातत्याने जतन व संवर्धन करणाऱ्या 'पंचरंग प्रतिष्ठान' या संस्थेनं मागील काही वर्षांत आपल्या कार्यातून एक खरा सुवर्णकाळ अनुभवला आहे. राज्य नव्हे तर देशपातळीवर ही विविध सामाजिक सांस्कृतिक प्रयोग, नाट्यवाचन, संगीतकार्यक्रम, कार्यशाळा आणि युवकांना कला क्षेत्रात दिशा देणाऱ्या उपक्रमांमुळे प्रतिष्ठानची ओळख गुणवत्तेचा ठसा उमटवणारी संस्था अशी झाली होती.

### नाट्यगृह अभावी सांस्कृतिक चळवळ अडचणीत!...

शहरातील भाई उद्धवराव पाटील सभागृह पाडल्यानंतर तेथेच सभागृह बांधणी गरजेचे होते परंतु पालिकेने येथे इतर बांधकाम केल्यामुळे शहरातील संपूर्ण सांस्कृतिक चळवळ अडचणीत आहे. स्व. विलासराव देशमुख यांच्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये नाट्यगृह प्रस्तावित आहे त्याची जागा टेलिफोन ऑफिसच्या पाठीमागे निश्चित आहे तरीही सांस्कृतिक क्षेत्र व नाट्यगृहाच्या कामासाठी प्रशासनाची आणि लोकप्रतिनिधींची प्रचंड उदासीनता आहे. सदर नाट्यगृह बांधावे आणि ते नगर परिषदेच्या माध्यमातून चालवले जावे त्याला कोणत्याही परिस्थितीमध्ये बीओटी तत्त्वावर हस्तांतरित करू नये.

**- डॉ. सतिश महामुनी**
सह महामंत्री, प्रदेश संस्कार भारती.

### व्यावसायिक नाटकांसाठी नाट्यगृहाची गरज...

तुळजापूर ही कलानगरी असून मी याच मातीत तयार झालो आहे. पंचरंग प्रतिष्ठान या संस्थेनी अनेक कलावंत घडवले, शेकडो प्रयोग केले, सांस्कृतीक उपक्रम घेतले. राज्यभरातील प्रसिद्ध कलाकार तुळजापूर शहरात पंचरंगमुळे येतात. या शहरात अद्ययावत असे नाट्यगृह निर्माण झाले तर नवतरुणाईला व्यासपीठ उपलब्ध होईल, नाट्यप्रेमी खूप आहेत. व्यावसायिक प्रयोग सादर होतील, रसिकांना प्रयोग पाहण्यासाठी सोलापूर, लातूर, पुणे इकडे जावे लागणार नाही. स्थानिक महिलांनाही दर्जेदार नाट्यकला अनुभवास मिळतील यासाठी रंगभूमिमीची आवश्यकता आहे.

**- उमेश जगताप**
(प्रसिद्ध सिने अभिनेता)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तीळ पिकाचे प्रमाणित बियाणे मिळणार अनुदानावर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान हे खाद्यतेलांच्या आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत तेलबियांचे उत्पादन वाढविणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पिकाची उत्पादकता वाढ व सुधारित वाणांच्या प्रसारासाठी उन्हाळी हंगाम २०२५ करिता लातूर जिल्ह्यातील निवड केलेल्या लाभार्थ्यांना उन्हाळी तिळासाठी हेक्टरी अडीच किलो प्रमाणित बियाणे केंद्र शासनाच्या १०० टक्के अनुदानावर वितरीतकरण्यात येणार आहे. यासाठी प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर व कमाल १ हेक्टर मर्यादित लाभ देय आहे. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांचा तिळासाठी ५०० ग्रॅम किंवा १ किलो याप्रमाणे पॅकिंगसाईज आहे. शेतक-यांना बियाणाच्या पॅकिंग साईजनुसार प्रमाणित बियाणे वितरीत करण्यात येईल. त्यामुळे क्षेत्रानुसार आवश्यक बियाण्यापेक्षा पॅकिंग साईज नुसार अधिकचे बियाणे परिगणित होत असल्यास यासाठीची रक्कम शेतकऱ्यांनी स्वहिश्याने भरावी लागेल. उन्हाळी तीळ पिकाच्या बियाण्याचा लाभ घेण्यासाठी संकेतस्थळावर प्रमाणित बियाणे वितरण, प्रात्याक्षिके, फ्लेक्झी घटक औषधे आणि खते या शीर्षकाअंतर्गत सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.



# लातूर मनपातील बनावट लिपीक भरती प्रकार मनपा निवडणुका लांबणीवर पडल्याचे फलित?

## असा प्रकार फक्त लातुरातच घडलाय की राज्यात अन्यत्रही याचा शोध घेणे गरजेचे!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** राज्यात मागच्या तीन साडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका खोळंबल्या होत्या. त्या आता टप्प्याटप्प्याने घेतल्या जात आहेत. दरम्यानच्या काळात लातूर शहर महानगरपालिकेमध्ये मनपा आयुक्तांच्या बनावट सही शिक्क्यांच्या आधारे सहा जणांना बनावट नियुक्तीचे आदेश दिल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे.

या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी सातत्याने मनपा निवडणुका लांबणीवर पडल्याने असे घडले की यामागे आणखी कोणते कारण आहे? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच असा प्रकार फक्त लातुरातच घडलाय की राज्यात अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही घडलाय? त्याचाही वरिष्ठ पातळीवरुन शोध घेणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रिया सुजाण नागरिकांतून व्यक्त होत आहेत. लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागात कायमस्वरूपी सेवेत असलेले काही कर्मचारी आपल्या जागेवर अन्य रोजंदारीवरील कामगारांना कामावर ठेवून चालत असल्याचा प्रकार यापूर्वीच जगजाहीर झालेला आहे. त्यामुळे मनपामध्ये कधी काय होईल याची शाश्र्वती कोणीही देऊ शकत नाही, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. त्यातच आता चक्क मनपा आयुक्तांच्या बनावट सही शिक्क्यांनिशी सहा जणांना लिपिक म्हणून आदेश दिल्याचा प्रकार समोर आला आहे.

शुभम बाळासाहेब गरड, ज्ञानेश्वरी रवी गरड, मारुती भगवान शिवणे, सोमनाथ लक्ष्मण पांचाळ, बापूराव कोंडीराम हुडे आणि आदित्य बंकट भिंगे यांना लातूर मनपात लिपिक म्हणून सेवेत रुजू होण्याचे आदेश मिळाले होते. आपल्याला मिळालेल्या आदेशाच्या सत्यतेबद्दल शंका वाटल्याने त्यांनीच मनपात माहितीच्या अधिकारात अर्ज करून मिळालेले नोकरीचे आदेश खरे की खोटे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता या नियुक्त्यांची मनपात नोंद नसल्याचे निदर्शनास आले.

मनपाचे सहायक आयुक्त आणि आस्थापना विभागाच्या चौकशीत हे आदेश बनावट असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी मनपा प्रशासनाच्या वतीने शिवाजीनगर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.लातूर महानगरपालिकेत रस्ते, गटारी, स्वच्छतेची कामे बनावट होत असल्याचे अनेकांनी पाहिले-अनुभवले आहे. एकाच कामाची दोनदा बिले उचलण्याचा प्रकारही सर्रास घडल्याचे ऐकण्यात आले होते. पण चक्क आयुक्तांच्या बनावट सही शिक्क्यानिशी नोकरीचे बनावट आदेश देण्याचा प्रकार किमान आतापर्यंत तरी उघडकीस आला नव्हता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागच्या अनेक काळापासून रखडल्या आहेत. त्यामुळेही अशा प्रकारच्या घटना घडल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मध्यंतरी राज्यातील शिक्षण विभागातील बनावट शालार्थ आयडीचा मुद्दा चांगलाच गाजला. शिक्षण विभागातच अशा प्रकारच्या बनावट गोष्टी घडतात असे नसून त्या आता मनपा सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांतही घडताना दिसत आहेत. त्यामुळे लातूरप्रमाणेच राज्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही अशा प्रकारच्या बनावट ऑर्डर देऊन नोकर भरती केली गेली आहे की काय ? याची खातरजमा करण्याची पाळी आता येऊन ठेपली आहे. याप्रकरणी आता वरिष्ठानीच तात्काळ लक्ष घालून बनावट नोकर भरतीचे हे रॅकेट कोणाच्या अधिपत्याखाली चालवले जाते, अशा घटना अन्यत्र किती ठिकाणी घडल्या आहेत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी सुजाण नागरीकातून केली जात आहे.

## धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस सहा महिन्यांची शिक्षा



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** सहा महिन्याच्या मुदतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी लातूरचे प्रथमवर्ग ४ न्या. श्रीनिवास पांचाळ यांनी आरोपीस ४ लाख ३० हजार रुपयांच्या दंडासह सहा महिन्याची शिक्षा सुनावली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, लातूर येथील हत्ते नगरचे रहिवासी तोशीब युनूस आलमेलकर (हा.मु.श्रीकृष्ण नगर, मळवटी रोड, मळवटी) यांनी राजकुमार नागनाथ कापसे यांच्या सिद्धेश्र्वर मनिलेंडर्स (शासनमान्य फायनान्स) कडून दि. २६ मे २०२० रोजी सहा महिन्याच्या मुदतीसाठी व्यवसाय व कौटुंबिक गरजांसाठी दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाची सहा महिन्यांची मुदत उलटून गेली तरीही त्यांनी सिद्धेश्र्वर मनिलेंडर्सला पैसे परत दिले नाहीत. या रकमेच्या वसुलीसाठी राजकुमार कापसे यांनी सतत तगादा लावला असता तोशीब आलमेलकर यांनी महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या मार्केट यार्ड शाखेचा २ लाख २० हजार रुपयांचा धनादेश सिद्धेश्वर मनिलेंडर्सच्या नावाने दिला होता. तो धनादेश देय तारखेला इंदिरा महिला नागरी सहकारी बँक, शाखा गांधी मार्केट लातूर येथील खात्यावर लावला. मात्र, सदरचा धनादेश खात्यावर पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याच्या कारणावरून न वटता परत आला. धनादेश परत आल्यानंतरही राजकुमार कापसे यांनी तोशीब आलमेलकर यांच्याकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळीचे धोरण अवलंबल्याने अखेर कापसे यांनी याप्रकरणी कलम १३८ नुसार प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी-४ न्यायाधीश श्रीनिवास एच. पांचाळ यांच्या न्यायालयात रितसर तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी सुनावणी होऊन आरोपीने जाणीवपूर्वक फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्याने त्याला ४ लाख ३० हजार रुपये दंड व सहा महिन्यांची शिक्षा सुनावली. याप्रकरणी फिर्यादी राजकुमार कापसे यांच्या वतीने ॲड. नसीर एच. शेख यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. अजित टेकाळे, ॲड. वसीम शेख, ॲड. प्रवीण शिंदे यांनी सहकार्य केले.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह करा : आ. देशमुख




**लातूर :** राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट अपूर्ण राहिल्याबद्दल तारांकित प्रश्न उपस्थित केला. प्रत्येक जिल्ह्यात २०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट असताना ते किती साध्य झाले, असा प्रश्न त्यांनी विचारला.

यावर सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री अतुल सावे यांनी, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या ३६ जिल्ह्यातील २१,६०० पात्र ओबीसी विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या बँक खात्यात थेट निवास व भोजन खर्च भत्ता वाटप करण्यात येत असल्याची माहिती दिली. तसेच, आमदार देशमुख यांच्या मागणीनुसार लवकरच वसतिगृह उभारणीचे आश्र्वासनही त्यांनी दिले. राज्याचे माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी विधानसभेत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीच्या अपूर्ण उद्दिष्टावर तारांकित प्रश्न उपस्थित केला. आ. देशमुख यांनी प्रश्न विचारला की, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट असताना, आत्तापर्यंत हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य झाले आहे? असा प्रश्न उपस्थित केला.

या उद्दिष्ट पूर्तीसाठी जेथे वस्तीगृहांचे बांधकाम

# लातूर येथे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास जिल्ह्यात आजपासून प्रारंभ झाला आहे. देशाच्या

### माजी सैनिक कुटुंबियांना देण्यासाठी प्रयत्न करणार -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

संरक्षणासाठी लढणाऱ्या, बलिदान करणाऱ्या सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी यामाध्यमातून आपल्याला प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने सशस्त्र सेना ध्वजदिन निधीमध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक बोर्डाच्या




अध्यक्ष श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, जिल्हा सैनिक अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.), ईसीएचएसचे प्रभारी अधिकारी कर्नल प्रकाश राजकर (नि.), ले. कर्नल बी. आर. हरणे (नि.) यांच्यासह वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. प्रारंभी वीरमाता, वीरपिता यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. तसेच शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांमुळे आपण सुरक्षित आहोत. या सैनिक, माजी सैनिकांच्या, त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना हातभार लावण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात आपले योगदान द्यावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अभिसरणासह इतर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. माजी सैनिक कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठीही विशेष उपक्रम हाती घेण्यात येतील, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

प्रत्येक वर्षी ७ डिसेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन करण्यात येते. ७ डिसेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत लातूर जिल्ह्याला ४७ लक्ष रुपये निधी संकलनाचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. मात्र, जिल्ह्यात १ कोटी १५ लाख ९५ हजार रुपये निधी संकलन करून २४६.७० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. त्यामुळे निधी संकलनात जिल्ह्याने सलग दुसऱ्या वर्षी राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. यंदाही जिल्ह्याला ४७ लाख रुपयांचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले.

यावेळी उपस्थित वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शौर्य पदक प्राप्त सैनिकांच्या वीरपत्नी, माजी सैनिक, विशेष पुरस्कार प्राप्त माजी सैनिक पाल्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. गतवर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय कार्यालय प्रमुखांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपिक एस. व्ही. घोंगडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## १८ डिसेंबरपर्यंत 'पदवीधर' यादीमध्ये नाव नोंदविता येणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** भारत निवडणूक आओग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदान याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार ६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत नमुना १८ प्राप्त झालेले अर्जांची प्रारूप यादी ३ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीवर १८ डिसेंबर २०२५ पर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत.

दावे व हरकती दाखल करताना नमुना अर्ज ७ व ८ मध्ये हरकती दाखल करता येतील. तसेच मतदार यादीमध्ये नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी १८ डिसेंबर पर्यंत नमुना अर्ज १८ ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने सादर करता येणार आहे. नमुना अर्ज १८ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी संबंधित लिंकचा वापर करावा. त्या अनुषंगाने ०५- औरंगाबाद विभाग पदवीधर संघाकरिता नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीत नाव समावेश करण्यासाठी लातूर तालुक्यातील सर्वसाधारण रहिवास असलेल्या सर्व पदवीधारकांनी नमुना अर्ज ७ व ८ मध्ये हरकती मतदान केंद्रनिहाय नियुक्त पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत. तसेच मतदार यादीत नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना अर्ज १८ भरून पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत, असे उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी कळविले आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा 'साई' येथे पुढाकार

**लातूर :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने साई येथे सुरू




करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. महिला सक्षमीकरणाच्या या उपक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ६३ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि. च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे. साई येथील या प्रशिक्षण केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान महिलांना देण्यात आले.

### ६३ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान

प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या ६३ महिलांनी शिलाई कामातील कला आणि कौशल्ये आत्मसात केली.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, गावचे उपसरपंच अमोल पवार, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# १३ डिसेंबरपासून लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार : निलेगांवकर

लातूर : येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ पासून पंढरपूर- तिरुपती व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

पंढरपूरमार्गे तिरुपती रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दि. १० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती.



त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०१३ ही तिरुपती पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून ही गाडी सुरु होणार आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल.ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदरमार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०१३ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ६ एसी थ्री टिअर , ९ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २३ डबे असणार आहेत.

ही सुविधा तूर्तास दि. १३ डिसेंबर ते दि. २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले.

याशिवाय या बैठकीत हरंगुळ रेल्वे स्थानकाची प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, लातूर-पुणे-खडकी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरु करणे आदी विषयांवरही महत्वपूर्ण चर्च झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली.